## व्यवसाय / धंधा

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मोः ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २७२ वा | बुधवार, दि. ११ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# अपयशी मुख्यमंत्री फडणवीसांनी निवडणूक आयोगाची वकिली करू नये - खा. प्रणिती शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार प्रणिती शिंदे यांची विधानसभा निवडणुकीतील एश्ट घोटाळा आणि विविध विषयासंदर्भात काँग्रेस भवन सोलापूर येथे सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष नरोटे यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते.

या पत्रकार परिषदेत बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, विधानसभा निवडणुकीत भाजपने षडयंत्र करून जिंकले म्हणून राहुलजी गांधी यांनी एक लेख लिहून भाजपला उघडे पाडले. निवडणुकीतील सत्य परिस्थिती लोकांसमोर निदर्शनाला आणले. निवडणूक आयोगाला जाब विचारले असता निवडणूक आयोगाने त्याचे उत्तर न देता त्याचे उत्तर भाजपवाले आणि मुख्यमंत्री फडणवीस हे फसवे आकडेवारी देत उत्तर देत आहेत. मतदानाच्या वेळेनंतर मतदानाची आकडेवारी कशी वाढली याचे उत्तर देत नाही, उउळश फुटेज विचारले असता नरेंद्र मोदींनी कायदाच बदलून टाकला आणि उउळश फुटेज देता येत नाही म्हणून सांगितले. त्यामुळे फडणवीसांनी निवडणूक आयोगाची वकिली करू नये महायुती सरकारच्या अपयशी कारभारामुळे जनतेचे हाल होत आहे त्याकडे लक्ष द्यावे असा टोला लगावला. सरकारी अधिकाऱ्यांवर प्रचंड दबाव असून आमच्या कार्यकर्त्यांना सुद्धा काम करायला अडचण निर्माण करत आहेत. भाजप अतिशय खालच्या पातळीचे राजकारण करत आहे. म्हणून लोकशाहीचे चौथा स्तंभ असलेले पत्रकारांनी यांना उघडे पाडावे. तसेच आगामी सर्व निवडणुका बॅलेट पेपर वर झाले पाहिजेत.

सोलापूर शहरात गेल्या बारा वर्षापूर्वी विमानसेवा सुरू होती. भाजपच्या काळात बंद पडली. गेली अकरा वर्षे देशात राज्यात भाजपची सत्ता असून सुद्धा विमानसेवा का सुरू होऊ शकले नाही याचे उत्तर कोणीच देत नाही. काल सर्वांच्या प्रयत्नाने विमानसेवा सुरू झाली त्याचे स्वागत करते पण गोव्याला विमानसेवा सुरू करून कोणते उद्योग येणार आहेत. विमानसेवाच सुरू करायची असेल तर सोलापूर ते मुंबई, तिरुपती, बंगलोर, हैदराबाद, पुणे विमानसेवा सुरू करा त्यामुळे सोलापूर शहर जिल्ह्याचा विकास, प्रगती होईल. टेक्सटाइल, गारमेंट उद्योग, क्ळ, इतर



उद्योग सोलापूरात वाढीस लागतील, नवीन उद्योग येतील.

ऑपरेशन सिंदुर बाबत प्रचारसभेत मोठमोठ्ठे फिल्मी डायलॉग मरणारे मोदीजी ऑपरेशन सिंदुर ची माहिती देण्यासाठी जगभरात शिष्टमंडळे पाठवीत आहेत. व्यापाराची धमकी देऊन सीजफायर मी करायचे लावले म्हणून आतापर्यंत अमेरीकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प आतापर्यंत बारा वेळा जाहीरपणे सांगितले त्यावर मोदी मूग गिळून गप्प आहेत. यामुळे सैन्यदलाचे मनोबल कमकुवत होत आहे. जनतेची आणि विरोधी पक्षाची मागणी आहे की संसदेत येऊन देशातल्या लोकांना याची माहिती द्यावी ते येत नाही आणि माहिती देत नाहीत. भारताचा विजय का घोषित केला नाही. त्यामुळे आम्ही ऑपरेशन सिंदुर संदर्भात विशेष अधिवेशनाची मागणी करत आहोत. १९७१ साली कणखर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तत्कालीन अमेरिकेचे राष्ट्रपती निक्सन यांना इंदिरा गांधींनी झुकवले होते. फ्रान्सने राफेलचे तंत्रज्ञान भारताला दिले नाही. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर पाकिस्तानला अगोदरच सांगतो की आम्ही पाकिस्तानच्या तळावर हल्ला करणार यामुळे पाकिस्तान सावध झाला. त्यामुळे आपल्या सैन्यदलाचे नुकसान झाले. अनेक जवान शहीद झाले. त्यांना शहिदांचा दर्जा दिला नाही. आतंकवादी हल्ला केलेले चार आतंकवादी अजून फरार आहेत ते का पकडले गेले नाहीत मोदी सरकारच्या अश्या कारभारामुळे भारत जगात कमकुवत आहे हे दिसून येत आहे.

तळागाळातील लोक आमच्यासोबत असून काँग्रेस पक्ष आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका निवडणुका पूर्ण ताकदीने लढणार आहे. गेल्या अकरा वर्षातील भाजपचा अपयशी कारभार, महागाई, बेरोजगारी, शेतकरी आणि सर्वसामान्यांचे जिव्हाळ्याचे प्रश्न याबाबत जनजागृती कार्यक्रम काँग्रेस पक्षाच्या वतीने लवकरच सुरू करणार आहोत. तसेच यावेळी शहर अध्यक्ष नरोटे यांनीही पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ६ नंतर ७६ लाख मतदान झाले आहे, अशी कबुली निवडणूक आयोगाने दिली आहे. EVM घोटाळ्या प्रमाणे हाही एक घोटाळा आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत ही परिस्थिती पुन्हा होऊ नये, याची दक्षता निवडणूक आयोगाने घ्यावी.

या पत्रकार परिषदेस सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष नरोटे, प्रदेश सरचिटणीस माजी महापौर संजय हेमगड्डी, विनोद भोसले, प्रवीण निकाळजे, मा. नगरसेविका परवीन इनामदार, अनुराधा काटकर, कार्याध्यक्ष मनोज यलगुलवार, प्रदेश चिटणीस शकील मौलवी, महिला अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, प्रवक्ते नागनाथ कदम, मध्य युवक अध्यक्ष वाहिद बिजापुरे, मिडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला, ब्लॉक अध्यक्ष देवा गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, VJNT अध्यक्ष युवराज जाधव, दिनेश म्हेत्रे, संजय गायकवाड, सागर उबाळे, सुभाष वाघमारे, भीमराव शिंदे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# ओ.बी.सी मतपेढी सक्रीय करण्याचा भाजपचा प्रयत्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा सोलापूर दौरा चांगलाच आठवणीत आणि चर्चेचा राहणारा ठरला. आगामी महापालीका व जिल्हापरिषद निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर चाचपणी करण्यासाठी बावनकुळे यांचा दौरा होता. राजमाता अहिल्यादेवी होळकर मुतीर्वाटप कार्यक्रमात अहिल्यादेवींच्या नावाने अभियान सुरू करण्यास बावनकुळे यांनी सुचवले याबरोबरच धनगर आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी भाजप शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे सांगून बावनकुळे यांनी ओ.बी.सी फॅक्टरला बुस्ट देण्याचा प्रयत्न केला. धनगर समाज व ओ.बी.सीं चा भक्कम पाठींबा हे भाजपचे बलस्थान असून भाजपकडून ही व्होटबँक कायम राखण्याचा प्रयत्न होत आहे. प्रशासनाकडून सुरुवातीला आलेल्या दौऱ्यात पुन्हा बदल करून त्यामध्ये आमदार देवेंद्र कोठे यांच्या संपर्क कार्यालयात सदिच्छा भेट वाढवण्यात आली. या दौऱ्यात दोन्ही देशमुख आमदारांच्या निवासस्थानी भेटीचा उल्लेख नव्हता.त्यामुळे याबाबत माध्यमांमधून चर्चाही झाली. दौऱ्याच्या सुरवातीला बावनकुळे यांचा

ताफा थेट युवा आमदार देवेंद्र कोठे यांच्या संपर्क कार्यालयाकडे रवाना झाला. या ठिकाणी भारतीय जनता पार्टीचे आजपर्यंत डावलण्यात आलेले जुने कार्यकर्ते आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य बावनकुळे यांच्या स्वागताला थांबून होते.

तिथे सत्कार स्वीकारत कोठे यांच्या परिवारासोबत आणि जुन्या कार्यकर्त्यांसोबत नाश्त्याचा आस्वाद त्यांनी घेतला. याच ठिकाणी भावी नगरसेवकांची सुद्धा मांदियाळी पाहायला मिळाली. एका कार्यक्रमात बावनकुळे यांनी आमदार कोठे यांचे भरभरून कौतुक केले. सोलापुरात देवेंद्र निवडून आल्यानेच राज्यात भारतीय जनता पार्टीची सत्ता आली असे सांगत कार्यकर्त्यांचा उर भरून आणला.

प्रदेशाध्यक्ष यांच्या दौऱ्यात ज्येष्ठ आमदार विजयकुमार देशमुख, दुसरे जेष्ठ आमदार सुभाष देशमुख हे दोघेही कोणत्या कार्यक्रमाला आणि बैठकीला दिसून आले नाहीत. आमदार सुभाष देशमुख हे सोलापुरातच होते पण ते बैठकीला नव्हते. शहरातील बरेच कार्यक्रम उरकून बावनकुळे सायंकाळच्या सुमारास होटगी रोडवरील आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी चहाला गेले. चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा जुन्या कार्यकर्त्यांना ऊर्जा देऊन जाणारा ठरला परंतु त्यांनाही नाराजांची मने सांभाळावी लागली हे मात्र तितकेच खरे आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत भाजपमधील दोन आमदार सुभाष व विजयकुमार देशमुख आणी सचीन कल्याणशेट्टीव देवेंद्र कोठे असा सामना पहावयास मिळाला. मात्र भाजपमध्ये कोणतीही गटबाजी नसून सगळे आलबेल असल्याचा निवाळी बावनकुळे यांनी दीला.आगामी महापालीका निवडणूका महायुती म्हणून लढताना जागावाटप न जमल्यास स्वतंत्र लढण्याचे संकेतही यावेळी प्रदेशाध्यक्षांनी दीले. भाजप शहराध्यक्षपदी ज्येष्ठ नेत्या रोहिणी तडवळकर यांची झालेली निवड आणी आमदार देवेंद्र कोठे यांच्या कार्यालयात भाजपमधील जुन्याजाणत्या परंतु 'देशमुखी' गटबाजीमुळे डावलण्यात आलेल्या नेत्यांनी बावनकुळे यांचा केलेला सत्कार ही भाजप पक्षांतर्गत महत्वाची घटना मानावी लागेल.आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली जुन्या नव्या कार्यकर्त्यांचा मेळ घालण्याचे धोरण यातून दीसून येते.'देशमुखी'गटबाजीत नाराज कार्यकर्त्यांनाः देवेंद्रांच्या माध्यमातून ऊर्जा देण्याचा प्रयत्न भाजपकडून होताना दीसत आहे.याबरोबरच ओ.बी.सी मतपेढी सक्रीय करण्याचा प्रयत्न भाजपकडून होत आहे.

# पुणे विभागीय बोर्डाचा गलथान कारभार चव्हाट्यावर

## एस.एस.सीचा विद्यार्थी पुनर्मूल्यांकनामध्ये 100% गुण मिळवून राज्यात प्रथम

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** एस.एस.सी परीक्षा 2025 या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झालेला आहे. या परीक्षेमध्ये महात्मा फुले विद्यालय टेंभुर्णी या विद्यालयाने परंपरेनुसार आपल्या निकालामध्ये बाजी मारलेली आहे. विद्यालयाचा सुदर्शन तानाजी उंबरे हा 99.60% गुण घेऊन माढा तालुक्यात सर्वप्रथम आला होता, परंतु बोर्डाच्या काही पेपर तपासणारांकडून या विद्यार्थ्याचे काही विषयांचे गुण मुद्दामहून कमी करण्यात आले होते. ज्यावेळेस बोर्डाकडे या विद्यार्थ्यांच्या पेपरची फोटोकॉपी मागवण्यात आली व त्यानंतर यामध्ये तपासणारा कडून खूप चुका झालेल्या आहेत, असे निदर्शनास आले. याबाबत गुण वाढ करण्यासाठी बोर्डाकडे प्रस्ताव दाखल केला. त्यानंतर त्या विद्यार्थ्याचे काही विषयांचे गुण वाढवून, त्या विद्यार्थ्याला 100 % गुण मिळालेले आहेत.




"ज्या दिवशी निकाल जाहीर झाला, त्यावेळेस जर माझा पेपर व्यवस्थित व पारदर्शक तपासला असता, तर मला त्याच वेळेस 100 % गुण मिळाले असते व महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वप्रथम येण्याचा मान मला त्यावेळेसच मिळाला असता. परंतु मला खात्री होती की, माझा कोणत्याही विषयांमध्ये गुण कमी होणार नाहीत, म्हणून मी माझे पेपर पुन्हा चेक करायला लावले".
**- सुदर्शन उंबरे**, ( पुनर्मल्यांकननंतर 100 % गुण मिळवून महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वप्रथम)

तसेच समृद्धी सज्जन इंदलकर या विद्यार्थिनीला देखील 99.40% गुण बोर्डाकडून देण्यात आले होते. हिच्या देखील पेपरमध्ये बोर्डाच्या तपासणाऱ्यांकडून गुण कमी देण्यात आले होते. हिचे देखील गुण पुनर्मूल्यांकननंतर 99.80 % झालेले आहेत. त्यामुळे ती माढा तालुक्यामध्ये दुसरी व मुलींमध्ये माढा तालुक्यात सर्वप्रथम आली. तसेच विद्यालयाच्या कु. इकरा इरफान रास्तापुरे व यश बापू बागवाले या दोघांनी 99.20 % गुण मिळवून माढा तालुक्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. विद्यालयाचा निकाल 100 % लागलेला असून यामध्ये 99% च्या पुढे 6 विद्यार्थी आहेत, तसेच 95% च्या पुढे 19 विद्यार्थी आहेत व 90% च्या पुढे 45 **(पान 2 वर..)**

# उजनी धरणात ७८.५३ टीएमसी पाणीसाठा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात गेल्या मे महिन्यात मोठ्या प्रमाणावर झालेल्या पावसाच्या जोरावर उजनी धरणातील एकूण पाणीसाठा ७८.५५ टीएमसीपर्यंत



वधारला असून, यात उपयुक्त पाणीसाठा १४.८९ टीएमसी आहे. धरण २७.८० टक्के भरले आहे. दुसरीकडे जिल्ह्यातील सात मध्यम प्रकल्पांमध्येही अवघ्या १५ दिवसांत अडीच टीएमसी पाणीसाठा वाढला आहे. सोलापूर शहराला खेटून असलेल्या एकरूख प्रकल्प अर्थात हिप्परगा जलाशयात १.८८ टीएमसी झाला असून, त्याची टक्केवारी ८७.०३ एवढी मोठी आहे. त्यामुळे या जलाशयात पाणीसाठा आणखी वाढल्यास पाणी दोन्ही मुक्त सांडव्यातून सोडण्याची तयारी जलसंपदा विभागाने केली आहे. हे सोडलेले पाणी सोलापूर शहरातील पुणे नाका, बार्शी रस्त्यासह अवंती नगरी, वसंत विहार व अन्य नागरी वसाहतींमध्ये घुसण्याची शक्यता जलसंपदा विभागाकडून वर्तविण्यात आली असून, त्या अनुषंगाने सतर्कतेचा इशारा यापूर्वीच देण्यात आला आहे.

# जिल्ह्यातील साडेचारशे शाळांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शासनाने राज्यातील सर्व शाळांना जिओ टॅगिंग करून भौतिक सोयी-सुविधांची माहिती भरावे, असे आदेश दिले आहेत. मात्र, जिल्ह्यातील 446 शाळांनी सोयी-सुविधांची माहिती अद्यापही भरली नाही. त्यामुळे शिक्षण आयुक्तांच्या आदेशाकडे शाळा दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे.

भौतिक सोयी-सुविधांची माहिती ॲपवर भरणे बंधनकारक असताना जिल्ह्यात सुमारे साडेचारशे शाळांनी सोयी-सुविधांची माहिती न भरल्याने त्या शाळेत सुविधांचा अभाव असल्याची चर्चा शिक्षकांमध्ये होत आहे. त्यामुळे अशा शाळांवर काय कारवाई होणार याकडे पालकांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लीकेशन सेंटर संस्थेद्वारे शालेय शिक्षण विभागातील सर्व प्रकारच्या शाळांचे भौतिक सोयी-सुविधांची ठिकाणे छायाचित्रासह टॅग करून माहिती महास्कूल जीआयएस ॲपवर माहिती भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार जिल्ह्यातील दोन हजार 327 शाळांनी माहिती भरली आहे. दरम्यान, याआधीच शिक्षण आयुक्तांच्या सूचनेनुसार प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी गटशिक्षणाधिकारी यांची ऑनलाइन बैठक घेऊन शाळांना जिओ टॅग बंधनकारक केल्याची माहिती दिली. तसेच जिल्ह्यातील शाळांकडून जीआयएस मॅपिंग करून माहिती भरून घेतली. तसेच यावेळी अनेक तांत्रिक अडचणी असल्यामुळे भौतिक सोयी-सुविधांचे फोटो अपलोड करताना मुख्याध्यापक, शिक्षकांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागले आहे.

कादर शेख, शिक्षणाधिकारी, प्राथमिकशाळांनी जिओ टॅग करून भौतिक सोयी-सुविधांची माहिती भरणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार दोन हजार 327 शाळांनी माहिती भरली आहे. तर 446 शाळांनी अद्यापही माहिती भरली नाही. ज्या शाळांनी माहिती भरली नाही. अशा शाळांवर कारवाई करण्यात येणार आहे.

# आषाढी यात्राः होडी चालक, मालकांनी १५ जून पर्यंत होड्यांची नोंदणी करावी - जिल्हाधिकारी आशिर्वाद

- **आसनक्षमतेपेक्षा जास्त जलप्रवासी वाहतुक करु नये**
- **सुर्यास्तानंतर जलप्रवास वाहतुक बंद ठेवावी**

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुध्द एकादशी दि.०६ जुलै २०२५ रोजी असून, यात्रा कालवधी २६ जून ते १० जुलै असा आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. वारकऱ्यांसाठी चंद्रभागा स्नान फार मानले जाते. चंद्रभागा स्नानासाठी नदी पात्रात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. तसेच येणारे भाविक चंद्रभागा नदीत नौका विहार करतात. या कालावधीत कोणतीही अनुचित घडना घडू नये तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने



सर्व होडी मालकांनी व चालकांनी होड्याची नोंदणी करावी असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिले.

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास पंढरपूर येथे होडी मालक व चालक यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, भीमा पाटबंदारे कार्यकारी **(पान 2 वर..)**










पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

## आपणही होवू शकता "मुक्त पत्रकार"

नमस्कार....,

आपणही "मुक्त पत्रकार" होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक "मुक्त पत्रकार" होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक "कटूसत्य" या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 002001120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि "मुक्त पत्रकार" होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये "मुक्त पत्रकार" म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) "मुक्त पत्रकार" मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर "मुक्त पत्रकार" म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती "मुक्त पत्रकार" म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे "मुक्त पत्रकार" झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच "मुक्त पत्रकार" होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दै.सा.कटूसत्य

टिपः- "कटूसत्य" व "वृत्तदर्पण" या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.

## संपादकीय

# राजनैतिक पर्यटनाचा हिशेब!

आता या सर्वांकडून आपले दौरे कसे अत्यंत यशस्वी झाले त्याचे दावे केले जातील आणि सत्ताधीश आपल्या मास्टरस्ट्रोकच्या आत्मस्तुतीत मग्न होतील. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताच्या न्याय्य भूमिकेस पाश्चात्त्य देश, माध्यमे यांनी योग्य तो न्याय दिला नाही, अशी एक सर्वसाधारण भावना आपल्याकडे व्यक्त झाली. आपल्यावर दहशतवाद लादणाऱ्या पाकिस्तानला इतरांनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून जितके खडसावयाला हवे होते तितके त्यांनी केले नाही. त्यात भारत-पाकिस्तान संघर्षात आपणच शस्त्रसंधी घडवून आणला असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एकदा नव्हे तर तीन वा चार वेळा सांगून आपणावर अन्याय केला. सबब आपल्या सत्ताधीशांच्या मनात पाश्चात्त्य माध्यमे, विचारवंत, राज्यकर्ते इत्यादींबाबत एक अढी असते. म्हणून या सगळ्यांस आपण भीक का घालावी असा एक प्रश्न सतत आपल्या राज्यकर्त्यांकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे विचारला जात असतो. तो योग्य. पण तरी जगास आपली भूमिका समजावून सांगण्यासाठी सर्वपक्षीय खासदार शिष्टमंडळे पाठवण्याचा 'मास्टरस्ट्रोक' निर्णय आपल्या शासकांनी घेतला. त्यानुसार ५९ खासदार ३२ देशांची सैर करून आले. डेमॉक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगो, सिएरा लिओन, लायबेरिया, गयाना, ब्राझील, पनामा, कोलंबिया, स्लोवेनिया, अल्जेरिया, बहारीन, इथियोपिया, डेन्मार्क आदींसह अमेरिका, जपान, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, इटली अशा देशांस या खासदार-मंडळांनी भेटी दिल्या. या दौऱ्यात या सर्वांनी मिळून ७२ निवेदने प्रसृत केली. खासगी क्षेत्रात जेव्हा एखाद्या कर्मचाऱ्यास कंपनीखर्चाने परदेशी पाठवले जाते तेव्हा आल्यावर त्याने काय साध्य केले त्याचा आढावा घेतला जातो. भारत सरकारही तितक्याच कार्यक्षमतेने काम करत असल्याने या दौऱ्यांचा जमाखर्च मांडण्याच्या प्रयत्नाचे स्वागतच होईल. तो मांडण्याआधी एक प्रश्न.

एका बाजूने या परदेशीयांची पत्रास आपण ठेवायची गरजच काय, असे मत व्यक्त केले जात असताना त्यांच्या समोर आपण आपली बाजू मांडायला मुळात गेलोच का? यातील पाश्चात्त्य देश, विचारवंत, माध्यमे भारतद्वेष्टी आहेत, भारताची प्रगती त्यांस बघवत नाही, भारत मोठा झालेला त्यांस नको आहे इत्यादी इत्यादी भावना सत्ताधीशांठायी असताना 'आम्ही किती चांगले आणि पाकिस्तान किती वाईट' अशी स्वसमर्थनाची गरज आपणास का वाटावी? दुसरे असे की यातील कित्येक देशांचे प्रमुख हे आपल्या पंतप्रधानांचे जीवश्चकंठश्च मित्र तरी आहेत किंवा त्यांचे मोठे चाहते तरी आहेत. उदाहरणार्थ अनुक्रमे अमेरिका आणि इटली. असे असताना मित्रांसमोर आपली बाजू मांडण्याची आवश्यकता काय? बरे, ती आहे असे मानले तर निदान त्या देशाच्या सर्वोच्च नेत्यांनी-म्हणजे आपल्या पंतप्रधानांच्या मित्र/चाहत्यांनी- आपल्या शिष्टमंडळांचे स्वागत करून त्यांचे ऐकून घ्यायला हवे. तेव्हा अमेरिकेत अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इटलीत पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी आपल्या शिष्टमंडळांचे आदरातिथ्य करून त्यांस सन्मानाने वागवणे अपेक्षित होते. कारण ज्या प्रमाणे ट्रम्प आपल्या पंतप्रधानांचे मित्र आहेत त्याच प्रमाणे मेलोनी या आपल्या पंतप्रधानांच्या निस्सीम चाहत्या आहेत. तेव्हा या उभयतांकडून अशी अपेक्षा करणे गैर नाही. परंतु तसे झाल्याचे दिसत नाही. अमेरिकेत उपाध्यक्ष जेडी व्हान्स हे आपल्या शिष्टमंडळास भेटले आणि इटलीत तेथील प्रतिनिधीगृहाच्या फुटकळ समिती प्रमुखांपलीकडे कोणी अन्य आपल्या शिष्टमंडळास सामोरे गेल्याचे दिसत नाही. भारत-पाक संघर्षात अमेरिकेचे उपाध्यक्ष व्हान्स यांनी 'भारत आणि पाकिस्तान त्यांचे त्यांचे काय ते बघून घेतील' अशा अथार्चे विधान केले होते, त्याचे स्मरण या प्रसंगी अनुचित ठरणार नाही. ही शिष्टमंडळे आपण पाठवली कारण पाश्चात्त्य माध्यमांनी 'ऑपरेशन सिंदूर', ते सुरू करण्यामागील आपली अपरिहार्यता आणि या मोहिमेतील आपले भव्य यश यांची दखल घेतली नाही, असे एक समर्थन या संदर्भात केले गेले. त्यातील तथ्याबाबत दुमत नाही.

त्यामुळे पुढील प्रश्न असा की या ३२ देशांतील किती प्रमुख प्रमुख माध्यमांनी या भारतीय लोकप्रतिनिधी भेटीस विस्तृत प्रसिद्धी देत त्यावर संपादकीय भाष्य अथवा टिप्पणी केली? सिएरा लिओन, कांगो, पनामा अशा देशांत आपल्या खासदार दौऱ्यास भरपूर प्रसिद्धी दिली असे एक वेळ मान्य करता येईलही. कारण दृष्टीआड सृष्टी. पण जे दृष्टीसमोर आहे त्यांचे काय? म्हणजे लंडनचा 'द फायनान्शियल टाइम्स', 'द टाइम्स', 'गार्डियन', जपानमधील 'असाई शिंबून', 'द जपान टाइम्स', फ्रान्समधील 'ले माँद' वा 'ले फिगारो', अमेरिकेतील 'द न्यूयॉर्क टाइम्स', 'द वॉशिंग्टन पोस्ट' ही वर्तमानपत्रे आणि 'बीबीसी', 'सीएनएन', 'फॉक्स' आदी प्रमुख वृत्तवाहिन्यांनी या आपल्या 'मास्टरस्ट्रोक'ला किती महत्त्व दिले? याचे सर्वसमावेशक उत्तर शून्य असे देता येईल. नाही म्हणायला साऊथ आफ्रिकेत तेथील प्रमुख वर्तमापत्र 'द स्टार'ने सुप्रिया सुळे यांची सविस्तर मुलाखत छापली. पण त्यामागे त्यांचे वडील जे की शरद पवार यांचा हात असणार असा संशय सत्ताधाऱ्यांतील काही वा त्यांच्या समर्थकांतील बहुतेक सर्व घेतीलच. तसा तो घेण्यास जागा आहे कारण दक्षिण आफ्रिकेच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सुळे यांच्याकडे होते. त्यामुळे आपले पंतप्रधान आणि शरद पवार यांचे सौहादार्चे संबंध लक्षात घेता अन्य काही देशांच्या शिष्टमंडळांचे नेतृत्वही सुळे यांच्याकडे दिले गेले असते तर या दौऱ्यांस अधिक प्रसिद्धी मिळती असेही काहींचे म्हणणे असेल. तेही रास्तच. अन्यत्र कुवेत, बहारीन, सौदी अरेबिया इत्यादी देशांत नाही म्हणायला तेथील माध्यमांनी आपल्या खासदार दौऱ्याची दखल घेतली. पण या देशातील सत्ताधाऱ्यांकडेच त्यांच्या माध्यमांची मालकी असल्याने त्यास किती महत्त्व द्यावे, हा प्रश्न. बाकीच्या ठिकाणी परिस्थिती तशी दयनीयच म्हणायची. कारण फ्रान्ससारख्या महत्त्वाच्या देशात तर आपल्या शिष्टमंडळास भारत-फ्रान्स मैत्री संघांतील सरकारी पदाधिकाऱ्यांव्यतिरिक्त कोणी ज्येष्ठ भेटल्याचे उपलब्ध माहितीवरून तरी दिसत नाही. अन्य देशांत तेथील ज्येष्ठ पत्रकार, संपादक, विचारगट वगैरेंनी आपल्या प्रतिनिधींशी संवाद साधला, भारताची बाजू समजावून घेतली, त्यावर भाष्य करणारी टिपणे लिहिली असे काही अद्याप तरी समोर आलेले नाही. त्यातल्या त्यात आनंद रशियाने दिला असे म्हणता येईल. द्रमुकच्या खासदार कनिमोळी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस 'रशियन टेलिव्हिजन' (आरटी) या सरकारी वाहिनीने तशी बरी प्रसिद्धी दिली. पण उपमंत्र्यांपेक्षा कोणी वरिष्ठ आपल्या लोकप्रतिनिधींस भेटला असे दिसत नाही.

या दौऱ्यात सर्वात उजवी ठरली ती शशी थरूर यांची कामगिरी. त्यांच्या बौद्धिक चातुर्यामुळे कोलंबियाने पाकिस्तान संदर्भात केलेला ठराव मागे घेतला. जागतिक अर्थकारण, राजकारण आदींत कोलंबिया या देशाचे स्थान लक्षात घेतल्यास या विजयाचा आनंददेखील कमी नाही. बाकी या दौऱ्याचा फायदा भारतास किती झाला, किती नाही याची चर्चा अहमहमिकेने अनेक करतील. पण एक मुद्दा या दौऱ्याबाबत निर्विवाद दिसतो. तो म्हणजे शशी थरूर यांची उजळलेली प्रतिमा. सत्ताधीशांस एके काळी हे थरूर किती नकोसे होते, त्यांच्या विषयी काय काय बोलले गेले हा ताजा इतिहास. पण देशहितास नेहमीच प्राधान्य देणाऱ्या सत्ताधीशांनी या इतिहासाकडे दुर्लक्ष केले आणि तितक्याच देशाभिमानी थरूर यांनी देशाबरोबर स्वतःची प्रतिमा उजळवण्याच्या या संधीचे सोने केले. आता पंचाईत ही की त्यांची प्रतिमा इतकी उजळली की परराष्ट्रमंत्री जयशंकर यांच्यापेक्षा थरूर हेच बरे असे आता सत्ताधाऱ्यांस वाटू लागेल की काय असा प्रश्न पडतो. कदाचित आपल्याकडेही असा चमकदार थरूर का नाही, असे त्या विचारधारेतील काहींस वाटू शकेल. अशा वेळी आयात हा सिद्धहस्त पर्याय आहेच. तेव्हा परराष्ट्रमंत्रीपद मिळत असल्यास थरूर यांनीही ते जरूर स्वीकारावे आणि काँग्रेसनेही उदार अंतःकरणाने त्यांस भाजपस उसने द्यावे.

आता या सर्वांकडून आपले दौरे कसे अत्यंत यशस्वी झाले त्याचे दावे केले जातील आणि सत्ताधीश आपल्या मास्टरस्ट्रोकच्या आत्मस्तुतीत मग्न होतील. तथापि या मास्टरस्ट्रोकचे मर्दन अनेक देशांत सुरू असतानाच संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समितीच्या सहप्रमुखपदी पाकिस्तानची निवड झाली या वृत्ताकडे दुर्लक्ष केलेले बरे. शेवटी वाईट पाहिले नाही तर वाईट दिसत नाही या उक्तीनुसार हे सर्व दौरे यशस्वी झाले असे मान्य केले की त्यांचे अपयश लक्षात घेण्याचा प्रश्नच येत नाही. सबब या राजनैतिक पर्यटनाचा हिशेब हवा कोणास?

### प्रबोधन

# थोर व्यक्तीविषयक धर्मनिरपेक्ष । कबीरांना वंदू

कबीरांना संत म्हणण्याची रूढी आहे. परंतु त्यांच्या साहित्याच्या सर्वांगीण समीक्षेनंतर त्यांना महात्मा, समाजसुधारक, राष्ट्रीय ऐक्याचा पुरस्कर्ता महापुरुष, जातीधर्म उच्चाटनकर्ता, मुक्त मनाचा विचारवंत असं म्हणणं अधिक योग्य ठरेल. या थोर चिंतकाने लोक दुगुर्णातून मुक्त कसे होतील, सत्यशोधक कसे होतील, याचीच आयुष्यभर काळजी केली. त्यांच्या कार्याविषयी डॉ. कृ. ज्ञा. भिंगारकर म्हणतात, 'संत कबीरांनी सदाचार, सत्य, अहिंसा, दया, क्षमा आणि शांती या तत्त्वांचा उपदेश केला. कबीरांच्या समाजप्रबोधनात समाजाबद्दलची तळमळ आणि आत्मीयता दिसून येते. असा समाजसुधारक शतकातून एखादाच होतो!'

हिंदू विधवा स्त्रीच्या पोटी इ.स. १४००मध्ये जन्मलेल्या (मृत्यू १५१८) कबीरांना एका मुसलमान विणकर कुटुंबाने आश्रय दिला. शेले आणि शालू विणणे हाच त्यांचा उदरनिर्वाहाचा धंदा होता. एका भक्तिगीतात, कबिराचे विणतो शेले, कौसल्येचा राम। असा उल्लेख येतो आणि संत तुकोबांच्या अभंगात, उचनीच काही नेणे भगवंत । रोहिदासासंगे चर्म रंगू लागे। कबीराच्या मागे विणी शेले। असं म्हटलं आहे. पण शेले विणत होते कबीरच; राम नव्हे! मात्र ते रामानंदांचे शिष्य असल्यामुळे त्यांच्यावर 'रामभक्त' असा शिक्का पुराणकारांनी मारला. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदीच्या मते, ते दशरथपुत्र रामाचे भक्त नसून सत्यरूपतत्त्वाला ते राम म्हणतात, असा उल्लेख येतो. कारण कबीर हे समाजसुधारक होते. राममंदिरात जाणे, रामभजन करणे, अशी धार्मिकता त्यांच्या पुरोगामी मनात कधीच नव्हती.

धार्मिक रूढींचे ते कट्टर विरोधक होते म्हणूनच मूर्तिपूजा, जप-जाप्य, मंदिर-मशिदीत जाण्याची ते निंदा करतात. दगडाच्या देवाची पूजा करून देव भेटणार असेल तर मी पर्वताचीच पूजा करीन. देवाच्या दगडापेक्षा जात्याचा दगड श्रेष्ठ असतो. कारण त्याच्यामुळे जगाला भाकरी मिळते, असा दोहा त्यांनी लिहिला आहे. मूर्तिपूजेवरील त्यांचा आक्षेप प्रबोधनक्षम आहे. मुसलमानांच्या रोजा-नमाजवर टीका करताना ते म्हणतात, दिन को रोजा रखत है, रात हनत है गाय । नामस्मरणाबद्धलचे त्यांचे विचार मननीय आहेत. ते म्हणतात, माला तो करमें फिरे, जीभ फिरे मुखमाही । मन तो दस दिशा फिरे, यह तो स्मरण नाही ॥ (अर्थबोधासाठी आधुनिक भाषेत रूपांतर केलं आहे.) वैष्णव सांप्रदायिक रूढींचं जे प्रदर्शन करतात, त्याविषयी कबीर म्हणतात, वैष्णव हुआ तो क्या हुआ, उपजा नहीं विवेक । छाप, तिलक बनाकर जल गये लोग अनेक ॥ तात्पर्य, मूर्तिपूजा, जपमाळ, टिळेमाळा हा सर्व प्रकार व्यर्थ आहे, असं कबीर म्हणतात.

कबीरांना जातिभेद मान्य नव्हते. कुणी श्रेष्ठ नसतो आणि कुणी कनिष्ठ नसतो. सगळे समानच आहेत. ते म्हणतात, एक ज्योतीसे सब उत्पन्ना। कौन ब्राह्मण कौन शूद्रा। महात्मा कबीरांच्या वेळी संस्कृतचा वरचष्मा होता; तो नाथपंथी गोरक्षनाथ आणि त्यांच्या शिकवणीचे अनुयायी कबीर दोघांनाही मान्य नव्हता, म्हणून कबीरांनी म्हटलं, संस्कृत भाषा कुँए का पानी। कबीर की भाषा बहता पानी। कबीरांनी लोकभाषेतच दोहे आणि पदरचना करून समाजप्रबोधन तळागाळापर्यंत नेलं. संस्कृत शास्त्रीपंडित आणि मुसलमान मुल्लामौलवी कबीराचे निंदक, कट्टे विरोधक झाले. कबीरांनी त्यांच्या निंदेचा आत्मसुधारणेसाठी वापर केला. कबीर म्हणतात, निंदक निकटही राखिये, आंगन-कुटी बनाय । बिन साबन पानी बिना निर्मल करे स्वभाव॥

समाजसुधारक निर्भय असला पाहिजे, त्याने घरादाराच्या सुखाचा विचार सोडला पाहिजे. निःसंगपणे, एकाकीपणे झुंज दिली पाहिजे, असं ते म्हणतात, कबीरा खडा बाजार में लिये लकूटी हाथ। जो घर जलाये आपनो, चले हमारे साथ समाज सुधारावा म्हणून आपल्या सुखावर विस्तव ठेवणारा हा महात्मा, समाज काही केल्या सुधारत नाही हे दुःखही व्यक्त करतो. ते म्हणतात, सुखी है सब संसार के लोग । खाते है और सो जाते है दुःखी है दास कबीरही। जागता है और रोता है हे सगळं जग वेड्यांनी भरलेले आहे, सत्य सांगणाऱ्याला ते मारायला धावते आणि खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवतं(साधो जग बौराना, सत्य कहूँ तो मारने आये, झूठ कहो तो खुश होये ।।) तरीही कबीरदास समाजाचं भलं व्हावं, म्हणून निरपेक्ष भावाने उपदेश करीत राहिले. भारतीय शास्त्री-पंडित अहंमन्य, तुसडे, माणूसघाणे आणि ज्ञानोन्मत्त आहेत, हे कबीरांना आढळलं म्हणून ते म्हणतात, पोथी पढ पढ जग मरा, पंडित हुआ न कोई । ढाई (अढाई) अक्षर प्रेम का पढे वह पंडित होई । गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी, हिंदू-मुसलमान सर्वांनी प्रेमाने वागून समाजहित साधावं, अशी इच्छा त्यांनी सतत न कंटाळता व्यक्त केली. डॉ. भिंगारकर म्हणतात, ह्यअनेक समाजसुधारकांनी हिंदू-मुसलमानांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला, त्यात संत कबीरांचं योगदान फार मोठं आहे.' निरीश्वरवादी, विवेकवादी कबीर शेवटी म्हणतात, 'लोकांना सन्मार्ग दाखवण्याचा प्रयत्न मी केला, लोकांना सांगून सांगून मी थकलो. (माझं कर्तव्य मी केलं, आता मला कुणी दोष देऊ नका!)' जग सुधारत नाही म्हणून रडणारे कबीरजी मानवतेचे सर्वश्रेष्ठ उपासक आहेत. धर्मनिरपेक्ष, समाजहितनिष्ठ, शांततापूर्ण सहजीवनाच्या या समर्थकाला 'कबीर जयंती' निमित्ताने शतवार प्रणाम करून म्हणू या-

महात्मा कबीर मानवता भक्त ।
सांगे प्रेमतत्त्व, समाजाला ॥ १
रूढी, परंपरा तपासून पाही ।
अयोग्य ते देई, फेकूनिया ॥२
दगडाची मूर्ती पुजू नका म्हणे ।
आंधळेपणाने, जगू नका ॥ ३
दाढी, शेंडी, टिळे माळा व्यर्थ सारे ।
धर्मतत्त्व खरे, यात कोठे ?॥४
दया, क्षमा, शांती परस्पर प्रीती ।
हीच श्रेष्ठ नीती, स्वीकारावी ॥५
द्वेष, वैर, हिंसा करा विसर्जित ।
समाजाचे हित, साधावया ॥ ६
धमार्हून थोर आहे सदाचार।
प्रेम हेच सार, सुखदायी ॥७
धर्मनिरपेक्ष कबीरांना वंदू ।
राष्ट्रहित साधू, त्यांच्या मागे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

### प्रबोधन

# थोर व्यक्तीविषय प्रेमाचे अमृत । जगाला ते देती

मृत्यूचं चुंबन घेणारा महाकवी असं साने गुरुजी यांच्या आत्महत्येनंतर आचार्य अत्रे त्यांच्याविषयी म्हणाले होते. त्यांनी पुढे लिहिलं, 'पण आपुले मरण स्वतःच्या डोळ्यांनी पाहाणारे तुकारामांसारखे आणि मरणाच्या गळ्यात दोन्ही हात घालून त्याचं कडकडून चुंबन घेणारे साने गुरुजींसारखे महाकवी शतकाशतकांमधून एकदाच जन्माला येतात.' आचार्य विनोबा भावे म्हणाले, 'साने गुरुजींच्या मरणावर माझा विश्वास बसत नाही. अमृतस्य पुत्रः ही त्यांची वास्तविक पदवी आहे.' साने गुरुजींचे चरित्रलेखक य.ब. क्षीरसागर म्हणतात, 'देहत्यागानंतर गुरुजी अधिकाधिक प्रभावी होत चालले आहेत. त्यांचं राष्ट्रावरील अजोड प्रेम, थोर पुरुषांविषयीचा आदरभाव, विषमताविरोधक जीवनदृष्टी, दुःखितांविषयीची करुणा, बालकांवरील वात्सल्य या गोष्टी आजच्या काळात नितांत आवश्यक होत.'


२४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणात जन्मलेले साने गुरुजी ११ जून १९५० रोजी निवर्तले. पण अवघ्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात त्यांनी राष्ट्रकार्य, समाजकार्य आणि साहित्यसेवा या क्षेत्रात जी गगनचुंबी भरारी घेतली, ती केवळ थक्क करणारी आहे. समीक्षक प्रा.रा.ग.जाधव म्हणतात, 'गुरुजींचं जीवन, कार्य व वाङ्मय म्हणजे एक विलक्षण अजूबा, विलक्षण अद्भुत वाटते. हा अजूबा गांधीयुगातील सांस्कृतिक ऊर्जापवार्चा द्योतक आहे.' आपल्या राष्ट्रकार्यार्थ केलेल्या चळवळी, आंदोलनं यामुळे ७९ महिन्यांचा भोगावा लागलेला कारावास, प्रचंड वाङ्मय निर्मितीसाठी व्यतित करून साने गुरुजींनी एक आदर्श समाजापुढे निर्माण केला. मराठी साहित्याचा फकीर होऊन महाराष्ट्रात आयुष्यभर हिंडावं व लोकजीवनातील कथा, गीतं, चरित्रं, नाटकं यांचा अमोल संग्रह करावा, हे बालपणातील गुरुजींचं स्वप्न होतं. जर्मनीतील लोकवाङ्मयाचे संग्राहक ग्रिम बंधू हे त्यांचे त्यावेळी आदर्श होते. श्यामची आई हे साने गुरुजींचं आत्मकथन गेल्या ऐंशी वर्षात लाखोंनी खपलं, त्यावरील बोलपट राष्ट्रीय सन्मानप्राप्त झाला. पु.ल.देशपांडे लिहितात, ह्यज्याला श्यामची आई पुस्तक माहीत नाही, त्याला मराठी माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाही.' ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कादंबरीकार म्हणूनही गुरुजी प्रसिद्ध आहेत. १९४०मध्ये त्यांनी आस्तिक नावाची कादंबरी लिहून आस्तिक शब्दाला जो अर्थविस्तार प्राप्त करून दिला, तो सर्वांनी लक्षात घेण्यासारखा आहे. मनुष्यातील सत्प्रवृत्तींवर विश्वास ठेवून मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास करावयास जे झटतात, तेच खरोखर आस्तिक! असे आस्तिक हेच मानवी समाजाची आशा होत. आज अशांची नितांत गरज आहे. रूढ अथार्ने जे नास्तिक आहेत, तेसुद्धा या अथार्ने आस्तिक असू शकतात.

गुरुजी एक कवीसुद्धा होते, हे त्यांच्या पत्री या १६३ कवितांच्या काव्यसंग्रहावरून कळतं. आत्मपर आणि देशभक्तीपर अशा या कवितेमधली बलसागर भारत होवो। विश्वात शोभूनि राहो ॥ ही राष्ट्रप्रेमाची थोर कविता पत्रीमधीलच! आपल्या कवितांना साने गुरुजी माझे काव्यबाळ म्हणतात.

साने गुरुजींचं मन कवितेत हळवं होत असे. पण सामाजिक अन्याय, अत्याचार, विषमता यांच्याशी संघर्ष करताना ते मन प्रखर, क्रांतिकारी होई. १९३८ ते १९४८ या दहा वर्षांत त्यांनी सात वेळा उपोषणं केली. अमळनेरच्या टोलटॅक्सविरोधात संकल्प केला होता, पण त्यामुळे टॅक्स रद्द झाला आणि उपोषण मागे घेतलं. १९३८ मध्ये धुळे गिरणी कामगार लढ्यात जलसमाधीची घोषणा त्यांनी केली आणि लढा यशस्वी झाला. काँग्रेस पक्षाचे दोन लक्ष सभासद करण्यासाठी २१ दिवसांचं उपोषण गुरुजींनी केलं. अमळनेरच्या कामगारांच्या भूमिकेबद्दल प्रायश्चित्त म्हणून १९४४मध्ये उपोषण केलं आणि १९४६मध्ये प्राथमिक शिक्षकांवरील अन्यायाविरुद्ध उपोषणाची घोषणा त्यांनी केली; पण तडजोड झाली आणि गुरुजींनी उपोषण मागे घेतलं. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांच्या प्रवेशाच्या वेळी लढा यशस्वी होईपर्यंत उपोषण केलं आणि गांधीजींच्या हत्येने व्यथित होऊन प्रायश्चित्त म्हणून गुरुजींनी एकवीस दिवस उपोषण केलं.

राष्ट्रसेवा दलाचे संस्थापक आणि आंतरभारती ते विश्वभारतीच्या संकल्पनांना मूर्तरूप देण्यासाठी धडपडणारे साने गुरुजी जनजागरणासाठी पत्रकारम्हणून १९२७पासून निधनापर्यंत काम करत राहिले. त्यांनी विद्यार्थी मासिक, साप्ताहिक भारत, साप्ता. काँग्रेस, कर्तव्य सायं दैनिक, प्रदीप मासिक आणि साप्ताहिक साधना (आता मासिक) अशा नियतकालिकांना जन्म दिला. १९४६च्या पुण्याच्या कुमार संमेलनप्रसंगी साने गुरुजींना कुमारांचे गांधी अशा शब्दांत यथोचित गौरवण्यात आलं. प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, 'साने गुरुजींच्या जीवनकायार्चा नकाशा हा या शतकाच्या पूर्वाधार्तील सांस्कृतिक ऊर्जापवार्चा एक लघुरूप नकाशा होय. या नकाशाची निर्मिती हीच गुरुजींची महानता व तोच त्यांचा वारसाही.' जगद्गुरू तुकोबा जे का रंजले गांजले या अभंगात ज्याला साधू म्हणतात, तो साधू साने गुरुजीच होते. त्यांचं व्यक्तिमत्त्व ईश्वर या कल्पनेहून मोठं होतं. म्हणूनच खरा तो एकचि धर्म या भारतातील सर्व शाळांसाठी लिहिलेल्या 'प्रार्थना गीता'त साने गुरुजी म्हणतात, सदा जे आर्त अति विकळ । जयाना गांजिती सकळ। तया जाऊन हसवावे। जगाला प्रेम अपार्वे ॥ जगावर प्रेम करणाऱ्या साने गुरुजींना सप्रेम वंदन! करताना म्हणू या-

अमृताचे पुत्र । होते साने गुरुजी ।
म्हणाले विनोबाजी । खरेच ते ॥१
दिले ज्ञानामृत । वाङ्मय रूपाने ।
मराठीचे लेणे । समृद्ध ते ॥२
गोष्टींचे अमृत । दिले बालकांना ।
केले त्यांच्या मना । संस्कारित ॥ ३
राष्ट्रप्रेमामृत । समाजाला दिले ।
चैतन्य लाभले । उदासींना ॥४
प्रेमाचे अमृत जगाला ते देती ।
खरा धर्म म्हणती प्रेमाचारा ॥५
सेवेचे अमृत । कष्टकऱ्यांसाठी ।
गुरुजी ठेवती । आदर्श तो ॥६
प्रतिकारामृत । अन्यायाविरुद्ध ।
नव्हते निषिद्ध। गुरुजींना ॥७
अमृतत्त्वांची । करती 'साधना' ।
साने गुरुजींना । दंडवत ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

पान १ वरून

# पुणे विभागीय बोर्डाचा...

विद्यार्थी आहेत. तसेच गणित या विषयांमध्ये सुदर्शन तानाजी उंबरे, कोमल जोतीराम पाटील व गजानन खंडू क्षिरसागर या तीन विद्यार्थ्यांनी 100 पैकी 100 गुण मिळवलेले आहेत. तसेच मल्टी स्किल या टेक्निकल विषयांमध्ये तब्बल 54 विद्यार्थ्यांनी 100 पैकी 100 गुण मिळवलेले आहेत. समाजशास्त्र विषयात समृद्धी सज्जन इंदलकर हिने 100 पैकी 100 गुण मिळवले आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे, माध्यमिकचे मुख्याध्यापक विजय यादव, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शोएब बागवान, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक पालक संघ, बस विभाग यांनी अभिनंदन केले. दरवर्षी टेंभुर्णी केंद्रात व माढा तालुक्यात व परिसरात पहिले तीन क्रमांक याच विद्यालयाचे असतात, याची परंपरा आता देखील कायम राखली गेली आहे. इयत्ता दहावीला शिकवणारे शिक्षक नारायण भानवसे, विजय यादव, शरद सातव, विनोद जाधव, आनंद घळके, सचिन खडके, गगन गोडसे, योगेश शिंदे, सोहम व्यवहारे, संध्याराणी देशमुख या सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

तसेच राज्यात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत सुद्धा मूल्यमापन योग्य होत नसेल तर सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या बाबतीत बोर्डाकडून काय होत असेल? याबद्दल सर्व विद्यार्थी व पालकांकडून पुणे विभागीय बोडार्बाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. बोडार्तील पेपर तपासणारे अधिकारी हे प्रामाणिक व विद्यार्थ्यांच्या कष्टाची जाणीव असणारे असावेत, अशी विद्यार्थ्यांनी इच्छा व्यक्त केली.

# आषाढी यात्राः होडी चालक, मालकांनी...

अभियंता एस.के. हरसुरे, तहसिलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, उप कार्यकारी अभियंता ज्योती इंगोले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले तसेच होडी मालक व चालक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद म्हणाले, चंद्रभागा नदी पात्रात होडी मालकांनी व चालकांनी होड्याची नोंदणी करणे आवश्यक असून, ज्यांनी नोंदणी केली नाही त्या होडी मालकांना व चालकांना चंद्रभागा नदी पात्रात जलप्रवास वाहतुकीसाठी परवनगी दिली जाणार नाही. होड्यांना मिळालेला नोंदणी क्रमांक ठळक अक्षरात लावावा. वारी कालावधी अगोदर आपल्या होडींची दुरुस्ती करुन घ्यावी व वेळोवेळी देखभाल करावी. आपली होडी प्रवासी वाहतुक करण्यासाठी योग्य असल्याची खात्री करुन त्याबाबतचे हमीपत्र द्यावे. योग्य आसन क्षमता प्रवासी व चालक, मालकसहित निश्चित करावी. जलप्रवासी वाहतुकीचे वेळापत्रक निश्चित करावे, सुर्यास्तानंतर जल प्रवासी वाहतुक करु नये. होडीत लाईफ जॅकेटची उपलब्धता ठेवावी. नगर पालिका प्रशासनाने मुबलक प्रमाणात लाईफ जॅकेटची उपलब्धता करुन द्यावी. पाटबंधारे विभागाने भाविकांसाठी होड्यांना जलप्रवासी वाहतुकीची चढण्याची व उतरण्याची ठिकाणे निश्चित करुन द्यावीत. त्या ठिकाणी पाटबंधारे, पोलीस व नगरपालिका विभागाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. जेणेकरुन प्रवासी संख्या देखील आसन क्षमतेनुसार राहिल असेही जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी यावेळी सांगितले.

## वात्रटिका

### कातिल दुल्हन

जे लग्नाळू आहेत त्यांना
बायको मिळत नाही...
बायको मिळाली ज्यांना
ती कशी आहे कळत नाही...
हनिमूनला बाहेर जाणे
आता धाडसाचे वाटते...
सोनमचा किस्सा ऐकून
सनम बेवफा वाटते...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अल्प दृष्टी विद्यार्थ्यांना मिळणार पाठ्यपुस्तके




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात 211 विद्यार्थी दिव्यांग आहेत. त्या विद्यार्थ्यांना मोठ्या अक्षराची पाठ्यपुस्तके वितरण केली जाणार आहेत. पाठ्यपुस्तकांचे संच तालुकास्तरावर वितरण करण्यात आले आहेत. त्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवशी 211 अल्प दृष्टी असलेल्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळणार आहेत.

राज्य शासनाच्या समग्र शिक्षा मोफत पाठ्यपुस्तक योजनेतून जिल्ह्यातील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरित करण्यात येणार आहेत. येत्या आठ दिवसात 2025-26 चे नवे शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके देण्याची तयारी सुरू केली आहे. दरम्यान, शिक्षण विभागाने बालभारतीकडे तीन लाख 88 हजार 968 विद्यार्थ्यांसाठी 23 लाख 18 हजार 723 पुस्तक संच मागणी केली होती. त्या पाठ्यपुस्तकांचे वितरण सुरू आहे. त्यामुळे पहिल्या ते आठवीपर्यंतच्या तील लाख 88 हजार 968 विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळणार आहेत.

**शाळास्तरांवर वितरणास सुरुवात**

पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके देण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाकडून तयारी सुरू आहे. तालुकास्तरावर आलेले सर्व पाठ्यपुस्तके शाळास्तरांवर वितरण करण्यात येत आहे. 10 जूनपर्यंत सर्व शाळांना पाठ्यपुस्तके देण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली आहे.

# अक्कलकोटला दर्शनासाठी जाणाऱ्या ट्रॅव्हल्सला अपघात; 2 जागीच ठार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर-अक्कलकोट महामार्गावर कजार्ळा गावाजवळ शनिवारी सकाळी भीषण अपघात झाला. पुण्याहून अक्कलकोटकडे देवदर्शनासाठी निघालेल्या ट्रॅव्हल्स बसने महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिली.

या अपघातात दोन जण ठार झाल्याची प्राथमिक माहिती असून, 30 ते 35 भाविक असलेल्या बसमधील अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. यात लहान मुलांचाही समावेश आहे.

**नेमकं घडलं काय ?**

सोलापूर-अक्कलकोट महामार्गावर कजार्ळा गावाजवळ शनिवारी सकाळी भीषण अपघात झाला. भरधाव ट्रॅव्हल्स बसने उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिली. या अपघातात दोन जण ठार झाल्याची प्राथमिक माहिती असून, अनेक भाविक जखमी झाले आहेत. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याचं सांगितलं जात आहे. ही ट्रॅव्हल्स बस पुण्याहून अक्कलकोटला देवदर्शनासाठी निघाली होती. बसमध्ये सुमारे 30 ते 35 भाविक प्रवास करत होते. कजार्ळा गावाजवळ महामार्गाच्या कडेला ट्रक उभा असताना, भरधाव वेगाने आलेल्या बसने मागून ट्रकला जोरदार धडक दिली. धडकेमुळे बसच्या डाव्या बाजूचे मोठे नुकसान झाले असून, काही प्रवासी बसमध्ये अडकले होते. या अपघातानंतर घटनास्थळी मोठी खळबळ उडाली होती. ट्रकला मागून धडक बसल्याने ट्रॅव्हल्सचा समोरच्या भागाचा चक्काचूर झाला होता. स्थानिकांनी बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढलं असून जखमींमध्ये लहान मुलांसह महिलांचाही समावेश आहे.

**जखमींवर उपचार सुरु**

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस आणि आपत्कालीन सेवांच्या मदतीने अडकलेल्या जखमींना बाहेर काढण्यात आलं. काही जखमींमध्ये लहान मुलांचाही समावेश आहे. जखमींना तातडीने अक्कलकोट आणि सोलापूर सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. अपघाताचा नेमका कारण शोधण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला असून, ट्रॅव्हल्स बसच्या चालकाचा वेग आणि निष्काळजीपणाही यामागे असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येतो आहे. दरम्यान, मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही. या अपघातामुळे महामार्गावर काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी रस्त्यावरची वाहतूक सुरळीत करण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी तैनात केले होते.

# माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळणार अवजारे



**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून माळशिरस तालुक्यातील शेतकरी बांधवांना विविध अवजारांसह उपकरणे, कृषी सिंचनासाठी सुधारित अवजारे, ५० टक्के अनुदानावर डीबीटी धोरणानुसार दिले जाणार असल्याची माहिती माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी दिली. यावेळी कृषी अधिकारी नितीन चव्हाण, भरत कोळेकर व विस्तार अधिकारी ए. एम. सरवदे उपस्थित होते.

लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी २० जून २०२५ पर्यंत माळशिरस पंचायत समितीत अर्ज करावा या योजनेमध्ये अल्पभूधारक, दिव्यांग, महिला शेतकरी यांना प्राधान्य दिले जाणार आहे. लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी सातबारा उतारा, आधार कार्ड, बॅंक पासबुक झेरॉक्स प्रत, दिव्यांग लाभार्थ्यांना दिव्यांगत्वाच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत, या कागदपत्रासह आपला अर्ज पंचायत समितीमध्ये करावा.

डीबीटी योजनेतून लाभार्थीची निवड झाल्यावर लाभार्थ्यांना खुल्या बाजारातून, अधिकृत विक्रेत्यांकडून अवजारे खरेदी करावी लागणार आहेत. तसेच खरेदी करावयाची शेती अवजारे अधिकृत सक्षम तपासणी संस्थानी परिक्षण करून बीआयएस अथवा अन्य संस्थानी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार तांत्रिक निकषानुसार आवश्यक असणार आहे.

लाभार्थी निवड लॉटर पद्धतीने केली जाईल. अनुदान संबंधित शेतकऱ्यांच्या आधार लिंक असलेल्या बॅंक खात्यावर पीएफएमएस डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात येईल.

**...हे मिळणार साहित्य**

थ्री पिस्टन स्पे पंप, नॅपसॅक बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप, ब्रश कटर, सोलार इनसेक्ट ट्रॅप रोटावेटर, पलटी नांगर, पॉवर विडर, पेरणी यंत्र, ५ एचपी सबमर्सिबलपंप संच, डिझेल इंजिन, कडबा कुट्टी, ताडपत्री, स्लरोफिल्टर ही अवजारे तसेच मधुमक्षिका पेटी, ताग, यांचा समावेश आहे.

# POP मूर्तींवरील बंदी उठली, पण विसर्जन मात्र कृत्रिम तलावात

## हायकोर्टाने दिले आदेश

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (POP) मूर्तींची निर्मिती करणे आणि विक्री करणे यावरील बंदी आज, सोमवारी मुंबई हायकोर्टाने ३० जानेवारी रोजीच्या आदेशात केलेल्या बदलामुळे उठली. मात्र, पीओपी मूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये करण्यास बंदी असेल, असे आजचे चित्र आहे.

पर्यावरण प्रेमी रोहित जोशी आणि शाडूच्या मातीच्या आधारे मूर्ती बनवणारे मूर्तिकार यांनी वकील रोनिता भट्टाचार्य यांच्यामार्फत केलेल्या जनहित याचिकेत, मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने पूर्ण बंदीचा आदेश Maghi Ganesh Jayantiच्या निमित्ताने ३० जानेवारी रोजी काढला होता. तसेच त्या बंदीचे काटेकोर पालन करण्याचा आदेश राज्यातील सर्व महापालिका व जिल्हा प्रशासनांना दिला होता. त्या पार्श्वभूमीवर, पीओपी मूर्ती बनवणाऱ्या अनेक संघटनांनी हायकोर्टात धाव घेऊन बंदीच्या आदेशाला आव्हान दिले. तसेच याप्रश्नी राज्य सरकारकडे देखील पाठपुरावा केला. राज्य सरकारने याप्रश्नी तज्ज्ञ समितीमार्फत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला (CPCB) अहवाल पाठवला. त्यामुळे खंडपीठाने सीपीसीबीला भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश ५ मे रोजी दिले होते. त्याप्रमाणे सीपीसीबीने सोमवारी वकील अभिनंदन वग्यानी यांच्यामार्फत प्रतिज्ञापत्रावर भूमिका स्पष्ट केली.

'सीपीसीबीची १२ मे २०२० रोजीची सुधारित मार्गदर्शक तत्त्वे ही मार्गदर्शक स्वरूपातील आहेत. त्यानुसार, बंदीची तरतूद केवळ नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये पीओपी मूर्तींच्या विसर्जनाला आहे. निर्मिती व विक्रीला नाही. निर्मिती व विक्री करता येईल, पण त्यांचे विसर्जन नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये करता येणार नाही', असे स्पष्टीकरण सीपीसीबीतर्फे करण्यात आले. 'लहान पीओपी मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांत होण्यात काही अडचणी नाहीत आणि तशा सुविधा महापालिकांकडून उपलब्ध केल्या जात आहेत. परंतु, मोठ्या व उंच मूर्तींचा प्रश्न आहे', असे मूर्तीकार संघटनांच्या वकिलांनी निदर्शनास आणले. सीपीसीबीच्या तज्ज्ञ समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने निर्णय होण्यासाठी हा प्रश्न राज्य सरकारच्या विचारार्थ पाठवावा, अशी विनंतीही त्यांनी केली. तर 'मोठ्या मूर्तींच्या प्रश्नावर योग्य तो निर्णय घेण्यासाठी मुदत द्यावी', अशी विनंती राज्याचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी केली. तेव्हा, 'नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये पीओपी मूर्तींच्या विसर्जनाला आम्ही परवानगी देणार नाही, हे निश्चित आहे. मोठ्या मूर्तींविषयी योग्य तो निर्णय घेण्याबाबत सरकारला मुदत देत आहोत', असे खंडपीठाने स्पष्ट केले. तसेच 'आधीच्या आदेशात बदल करून पीओपी मूर्तींची निर्मिती व विक्री यावर बंदी नसेल, हे स्पष्ट करत आहोत', असे खंडपीठाने नव्या आदेशात स्पष्ट केले. तसेच सरकारला ३० जूनपर्यंत मुदत दिली.



**मोठ्या मूर्तींचे काय ?**

'मूर्ती लहान असो की मोठी... नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये विसर्जन करता येणार नाही, त्याला बंदीच असेल', अशी भूमिका केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रतिज्ञापत्रावर मांडली. त्यामुळे मोठ्या मूर्तींच्या प्रश्नावर नेमके काय ठरते? राज्य सरकार काय निर्णय घेते? त्यांच्या विसर्जनासाठी कोणती व्यवस्था निर्माण करण्याचा विचार होतो? की यंदाच्या वर्षापुरते नैसर्गिक प्रवाहांमध्ये अनुमती देण्याची विनंती हायकोटार्ला करते? अशा सर्व प्रश्नांची उत्तरे ३० जून रोजीच्या पुढील सुनावणीत मिळण्याची शक्यता आहे.

# महिलांनी कृषी प्रक्रिया उद्योजक व्हावे - प्रा दिनेश क्षिरसागर



**माढा (कटूसत्य वृत्त):-** विकसित कृषी संकल्प अभियान अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र मोहोळ द्वारे शिंदेवाडी तालुका माढा येथे शेतकरी शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आधुनिक कृषि तंत्रज्ञान आणि खरीप हंगाम नियोजन प्रसारासाठी विकसित कृषी संकल्प अभियान दि. २९ मे ते १२ जून २०२५ या दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पोहोचवण्याचे काम महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र मोहोळ, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर, राष्ट्रीय भरड धान्य संशोधन संस्था, सोलापूर यांच्यामार्फत केले जात आहे. आज माढा तालुक्यातील शिंदेवाडी येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विषयाचे विषय विशेषज्ञ श्री. दिनेश क्षिरसागर यांनी कृषि मालाचे मूल्यवर्धन, ज्वारी व भरड धान्य प्रक्रिया, मसाले प्रक्रिया, दुग्ध प्रक्रिया, पापड उद्योग, कडधान्य प्रक्रिया आणि प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना, महिला बचत गट सदस्यांसाठी बीज भांडवल सुविधा आणि अन्न प्रक्रिया लघु उद्योगाची सुवर्णसंधी याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. परशुराम पात्रोटी, वरिष्ठ शास्त्रज्ञ, केंद्रीय भरड धान्य संशोधन संस्था, सोलापूर यांनी भरड धान्याचे पौष्टिक तत्त्वे, विकसित वाण, बियाण्यांची उपलब्धता, लागवड तंत्रज्ञान आणि उद्योजकतेचे विकास याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. शिल्पा परशुराम यांनी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर च्या शिफारशी बाबत सविस्तर माहिती दिली.

पीक संरक्षण विषयाचे विषय विशेषज्ञ डॉ. पंकज मडावी यांनी खरीप हंगामातील कीड व रोग व्यवस्थापन तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यांमध्ये जन जागृती केली. माती व पाणी परीक्षण आधारित खत व्यवस्थापन याबद्दल उपस्थित शेतकऱ्यांना मृद विज्ञान व कृषि रसायन शास्त्रं विषयाचे विषय विशेषज्ञ श्रीमती काजल जाधव म्हात्रे यांनी माहिती दिली. याप्रसंगी शिंदेवाडी च्या सरपंच सौ मंदाकिनी शिंदे, मंडळ कृषि अधिकारी श्रीमती गायत्री चव्हाण, उप कृषि अधिकारी दादा पवार, सहायक कृषि अधीकारी श्री. राजशेखर कांबळे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री सुयोग ठाकरे, कृषि मित्र, महिला स्वयं सहायता गटाचे सदस्य आदींचे सहकार्य लाभले.

अनुसूची एक

प्रयोजन-- कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक २, अंतर्गत टप्पा क्रमांक २. पडसाळी उद्धरण नलिका.

जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, गाव दारफळ गावडी

संपादन करावयाच्या जागेचे वर्णन

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हे.आरमध्ये) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | १०२ | ०.१४ |
| २ | ७८ | ०.३३ |
| ३ | ७९ | ०.१६ |
| | एकूण | ० हे. ६३ आर |

अनुसूची- दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक २, अंतर्गत टप्पा क्रमांक २. पडसाळी उद्धरण नलिका.

प्रकल्प कार्याचे वर्णन : मौजे दारफळ गावडी, तालुका उत्तर सोलापूर, कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक २, अंतर्गत टप्पा क्रमांक २, पडसाळी उद्धरण नलिका.

समाजाला मिळणारे लाभ : सिंचन क्षेत्र वाढविणे, शेतकऱ्यांना लाभ होतो, सिंचनासाठी पाण्याचा वापर.

अनुसूची -- तीन

बाधित व्यक्तिचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे - सदर संपादित क्षेत्र हे शेत जमिनीचे असल्यामुळे बाधित व्यक्तिचे विस्थापन होत नाही व पुनर्वसन करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

अनुसूची -- चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश - निरंक आहे.

अनुसूची -- पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक ७ (मोहोळ), सोलापूर.

(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता -- जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर-४१३००१.

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील -- मा. जिल्हाधिकारी (भूसंपादन समन्वय शाखा), सोलापूर यांचेकडील आदेश क्रमांक २०२४/भू.सं./कार्या./आरआर-१६५१, दिनांक २२ मे २०२४.

सोलापूर, २६ मे २०२५.

**सही/-**
**कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.),**
**जिल्हाधिकारी, सोलापूर.**

जिमाका/सो/जाहि/४७/२०२५-२६

# अकरावी प्रवेश प्रक्रिया लांबणीवर, पहिल्या फेरीतील ॲलॉटमेंट २६ जूनला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशासाठी राबविण्यात येणारी अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पुन्हा एकदा लांबणीवर पडली असून, पहिल्या फेरीतील विद्यार्थ्यांच्या कॉलेजांचे ॲलॉटमेंट आता २६ जूनला प्रसिद्ध होणार आहे.

ॲलॉटमेंट यादीत नाव प्रसिद्ध होणाऱ्या विद्यार्थ्यांना २७ जून ते तीन जुलै या कालावधीत प्रवेश घ्यायचा असून, दुसऱ्या फेरीसाठी पाच जुलै रोजी रिक्त जागांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेत नोंदणी केलेल्य १२ लाख विद्यार्थ्यांना प्रवेशाचा आणखी प्रतीक्षा करावी लागेल.

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसा शून्य फेरीची गुणवत्तायादी ११ जून रोजी जाहीर होणार असून, १२ ते १४ जूनदरम्यान त्यानुसार प्रवेशाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यापूर्वी, जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकात १० जूनला पहिल्या फेरीसाठी कॉलेजांचे ॲलॉटमेंट (प्रवेशाची गुणवत्ता यादी) प्रसिद्ध होणार होते. आता सुधारित वेळापत्रकानुसार थेट ॲलॉटमेंट २६ जूनला होणार आहे. वेळापत्रकानुसार १७ जून रोजी विद्यार्थ्यांनी निवडलेल्या शाळा आणि प्रवेश प्रक्रियेचे परीक्षण करण्यात येणार आहे. पहिल्या यादीनंतर २७ जून ते तीन जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना कॉलेजांमध्ये प्रवेश घ्यायचा असून, दुसऱ्या फेरीसाठी पाच जुलै रोजी रिक्त जागांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

दरम्यान, प्रवेश प्रक्रियेत नोंदणी केलेल्या साधारण ८४ हजार विद्यार्थ्यांनी केवळ अजार्चा 'भाग एक' भरला होता. या विद्यार्थ्यांनी अजार्चा 'भाग दोन' भरला नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना दोन दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. त्याचप्रमाणे प्रवेश प्रक्रियेत सहभागी झालेल्या १२ लाख ७१ हजार विद्यार्थ्यांच्या अजार्नुसार, त्यांना कॉलेज ॲलॉटमेंट करण्यासाठी पुरेसा कालावधी अपेक्षित आहे. त्यामुळे केंद्रीय अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात येत असल्याचे स्पष्टीकरण संचालनालयाच्या वतीने डॉ. श्रीराम पानझडे यांनी दिले आहे.

**१२ ते १४ जून दरम्यान शून्य फेरीतील प्रवेश**

'प्रवेश प्रक्रियेत ११ जूनला अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल. या यादीच्या आधारे १२ ते १४ जून या कालावधीत व्यवस्थापन, संस्थांतर्गत कोटा आणि अल्पसंख्याक कोट्यातील म्हणजेच शून फेरीतील प्रवेश होणार आहेत,' अशी माहिती माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिली आहे.

**अकरावी प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक -**

- अंतिम गुणवत्ता यादी व शून्य फेरी वाटप- १२ ते १४ जून
- 'प्रवेश फेरी १'चे वाटप करणे- २६ जून
- कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याची अंतिम मुदत- २७ जून ते ३ जुलै
- 'प्रवेश फेरी दोन'साठी रिक्त जागांची यादी प्रसिद्ध करणे- ५ जुलै

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री २) आधार देणे, संयम ३) शिरा याच्यापासून बनवितात ४) मनाची स्थिती ५) उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या वडिलांचे नाव ६) पाण्याचे बाष्परूप ७) युध्दातील तोफवाहू वाहन ९) राजकारणात प्रवेश केलेला दाक्षिणात्य अभिनेता १२) कुर्त्याचा जोडीदार १४) शपथ (हिंदीत) १७) कालवणासाठी आवश्यक असणारा डोळ्यातून पाणी काढणारा १८) पटाईत, पारंगत २३) पैसे, अर्थ २५) वस्तूंची जुळवणूक २८) बंदूक (इंग्रजीत) २९) आधारित, एक शब्द-करार*** ३१) परत (हिंदीत) ३२) जंगली ३३) एक उद्योगपती-*** टाटा ३५) एक दिवंगत अभिनेत्री- ** लागू ३७) सरकार, सजा ४१) सहा दुणे ४२) जाड किंवा बारीक नसलेला सर्वसाधारण असा ४४) आकाश ४७) गोंधळ, गोंगाट ४८) पळभराचा काळ ५०) ईश्वर (उर्दू) ५१) थोरलाच्या विरूध्दार्थी ५२) एक जुने गीत- ** देवराया अंत आता पाहू ५४) शरीर ३६) बोली, वाचा, व्यापार करणारा

**आडवे शब्द :** १) महाराष्ट्रातील भाजपचे एक नेते ८) बे दुणे
१०) कर्नाटकातील एक जिल्हा ११) कोकणातील काटेरी मोठे फळ
१३) एक ज्वलनशील पदार्थ
१५) हसताना चेहऱ्याच्या या भागावर खळी पडते
१६) सचिन तेंडुलकरचे गुरू-**** आचरेकर १९) फळातील गोड द्रव
२०) उजवाच्या विरूध्दार्थी २१) दरवाजा, द्वार
२२) मोहाच्या पोळ्यातील गोड द्रव २४) सिल्व्हर (मराठीत)
२६) काळजी (इंग्रजीत) २७) बादशहाची पत्नी ३०) जुनाच्या विरूध्दार्थी
३२) अवजड ३४) कुटुंब ३६) एक उपदिशा ३८) मग्न, रममाण ३९) समुदाय, लोकांचा जमाव, एक शालेय विषय - ***शास्त्र ४०) तत्वांश, अर्क
४१) डोकेदुखीवर लावतात तो मलम ४३) ख्रिश्चन धर्मसेविका
४५) एक म्हण - ** वसे ते स्वप्नी दिसे
४६) नगरपालिका प्रमुख ४९) सुसाट असा वेग ५३) पाठीचा कणा याच्या साखळीने बनलेला असतो ५५) बगळा
५७) पश्चिम बंगालची राजधानी ५८) अवकाशात सोडले जाणारे अंतराळवाहन
५९) कागदांना जोडून ठेवणारी टोकदार पिन

## सुडोकु - 272

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 4 | 5 | 3 | 1 |
| 8 | 3 | 1 | | | 7 | 6 | | 9 |
| 5 | 4 | 9 | | | | 8 | | 7 |
| | 2 | | 5 | | 1 | | 7 | |
| 4 | 1 | | | | | 9 | 6 | |
| | 6 | 3 | | 2 | | | | |
| | | | | 3 | | 4 | 9 | 6 |
| | 9 | | 7 | 4 | | | 1 | |
| 2 | 8 | | | | 6 | 7 | | |

# माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नेत्र तपासणी शिबीर पार पडले



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स.म.शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना (अकलूज) चे संचालक पै.गोविंदभाऊ पवार मित्र परिवार माढा तालुका व बुधराणी हॉस्पिटल कोरेगाव पार्क पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आढेगाव तालुका माढा येथे नागरिकांची नेत्र तपासणी, गरजूंना मोफत चष्मा वाटप तसेच मोतीबिंदू निदान शिबीर पार पडले. यावेळी पै. गोविंदभाऊ पवार,आढेगावचे सरपंच कांतीलाल टेळे, उपसरपंच भाऊ वाघ, नागनाथ जवळगे, ग्रा.पं. सदस्य प्रवीण गायकवाड, माढा ता.यु.काँग्रेसचे अध्यक्ष आदित्य जाधव, महेंद्र पाटील, सतीश केचे, कूर्मदासचे संचालक नारायण गायकवाड, श्रीमंत केचे, नितीन केचे, पत्रकार सतीश काळे,पत्रकार विष्णू बिचकुले, भारत माने सर, आलेगाव खु. माजी सरपंच सोमनाथ कांबळे, बाबासाहेब चंदनकर, राजेंद्र निकम, बाळासाहेब बागाव, विठ्ठल केचे, गणेश वाघ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी बुधरणी हॉस्पिटल पुणे यांच्याकडून शिबिरासाठी आलेल्या डॉ.परमेश्वर गोडगे व कल्पना चव्हाण यांनी 327 नागरिकांची तपासणी केली. यामध्ये गोविंदभाऊ पवार मित्रमंडळातर्फे तब्बल 104 नागरिकांना मोफत चष्मा देण्यात आला असून 42 नागरिकांना बुधराणी हॉस्पिटल कोरेगाव पार्क पुणे येथे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसादिवशी म्हणजेच 12 जून रोजी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात येणार आहे. प्रसंगी किरण खटके, शुभम गाडे, सोमनाथ जवळगे, हर्षवर्धन व्यवहारे, शिवाजी व्यवहारे, डॉ.रोहित काळे, गोपीनाथ सोलनकर, गणेश सोलनकर, गोपाळ सोलनकर, बाळासाहेब निकम, बाळासाहेब शेलार यांच्यासह कोंढारभागातून संचालक पै.गोविंदभाऊ पवार यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# अनुसूचित जाती प्रवर्गातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सरकारी शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या कार्यालयामार्फत अनुसूचित जाती, या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व विद्या वेतन या योजनांचा लाभ देण्यात येतो. वरील सर्व योजना शासनामार्फत https://mahadbt.maharashtra.gov.in/Login/ या प्रणालीवरून ऑनलाईन राबविण्यात येत आहेत.

त्याअनुषंगाने सन 2025-26 या शैक्षणिक वर्षाकरिता महाडीबीटी प्रणालीवरील नवीन आणि नुतनीकरणाचे आवेदन अर्ज स्वीकृत, मंजूर करण्यासाठी दिनांक 15 जून 2025 पासून महाडीबीटी प्रणाली सुरू करण्यात येणार आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ, वरिष्ठ,व्यावसायिक, बिगर व्यावसायिक, तांत्रिक या सर्व महाविद्यालयांना याद्वारे सुचित करण्यात येते की, अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण फि परीक्षा फि, राजर्षी छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, विद्या वेतन या योजनांचे नवीन, नुतनीकरणाचे अर्ज विद्यार्थ्यांकडुन तात्काळ भरून घ्यावेत. व सदरचे आवेदन अर्ज मंजूरी करिता या कार्यालयाकडे ऑनलाईन सादर करण्यात यावे. उपरोक्त नमुद योजनेच्या लाभापासून मागासवर्गीय विद्यार्थी वंचित राहणार नाही याची सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नोंद घ्यावी. असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

# 14 वर्षाखालील बालकामगार आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिनांक 12 जून या जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिनाचे औचित्य साधून सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सोलापूर मार्फत बालकामगार प्रतिबंध करण्याच्या दृष्टिने जिल्हा कृती दलामार्फत सोलापूर जिल्ह्यात कारखान्यांना भेटी देणे, बालकामागर प्रथाविरोधीसह्यांची मोहीम राबविणे, पोस्टर चिकटविणे, जनजागृती करणे यासाठी दलाची स्थापना करण्यात आली असून त्यांच्या मार्फत आस्थापनांची तपासणी करून बालकामगार आढळून आल्यास त्यांची मुक्तता करणे व बालकामगार अधिनियमांतर्गत कार्यवाही करणे तसेच मालक, चालक यांचेकडून आस्थापनेमध्ये 14 वषार्खालील बालकामगार काम करीत नाहीत व भविष्यातही काम करणार नाहीत असे हमीपत्र संबंधितांकडून घेण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

कोणत्याही कारखाना, आस्थापना, हॉटेल, गॅरेज तसेच धोकादाय उद्योग यामध्ये बालकामगार ठेवणे कायद्याने गुन्हा असून अशा ठिकाणी बालकामगार आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

कोणत्याही कारखाना, आस्थापना, हॉटेल, गॅरेज तसेच धोकादायक उद्योग यामध्ये बालकामगार ठेऊ नये, असे आवाहन सहायक आयुक्त सुधीर गायकवाड यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील साडेचारशे शाळांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शासनाने राज्यातील सर्व शाळांना जिओ टॅगिंग करून भौतिक सोयी-सुविधांची माहिती भरावे, असे आदेश दिले आहेत. मात्र, जिल्ह्यातील 446 शाळांनी सोयी-सुविधांची माहिती अद्यापही भरली नाही. त्यामुळे शिक्षण आयुक्तांच्या आदेशाकडे शाळा दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे.

भौतिक सोयी-सुविधांची माहिती अ‍ॅपवर भरणे बंधनकारक असताना जिल्ह्यात सुमारे साडेचारशे शाळांनी सोयी-सुविधांची माहिती न भरल्याने



त्या शाळेत सुविधांचा अभाव असल्याची चर्चा शिक्षकांमध्ये होत आहे. त्यामुळे अशा शाळांवर काय कारवाई होणार याकडे पालकांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अ‍ॅप्लीकेशन सेंटर संस्थेद्वारे शालेय शिक्षण विभागातील सर्व प्रकारच्या शाळांचे भौतिक सोयी-सुविधांची ठिकाणे छायाचित्रासह टॅग करून माहिती महास्कूल जीआयएस अ‍ॅपवर माहिती भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार जिल्ह्यातील दोन हजार 327 शाळांनी माहिती भरली आहे. दरम्यान, याआधीच शिक्षण आयुक्तांच्या सूचनेनुसार प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी गटशिक्षणाधिकारी यांची ऑनलाइन बैठक घेऊन शाळांना जिओ टॅग बंधनकारक केल्याची माहिती दिली. तसेच जिल्ह्यातील शाळांकडून जीआयएस मॅपिंग करून माहिती भरून घेतली. तसेच यावेळी अनेक तांत्रिक अडचणी असल्यामुळे भौतिक सोयी-सुविधांचे फोटो अपलोड करताना मुख्याध्यापक, शिक्षकांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागले आहे.

कादर शेख, शिक्षणाधिकारी, प्राथमिकशाळांनी जिओ टॅग करून भौतिक सोयी-सुविधांची माहिती भरणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार दोन हजार 327 शाळांनी माहिती भरली आहे. तर 446 शाळांनी अद्यापही माहिती भरली नाही. ज्या शाळांनी माहिती भरली नाही. अशा शाळांवर कारवाई करण्यात येणार आहे.

# शाहीर राजेंद्र कांबळे यांना सर्वोत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार जाहीर

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** येथील शाहीर राजेंद्र कांबळे यांना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार जाहिर झाला असून हा पुरस्कार १४ जून २०२५ रोजी मुंबई येथे प्रदान करण्यात येणार आहे.

शाहीर राजेंद्र कांबळे हे अकलूजचे रहिवाशी असून इयत्ता ७ वी मध्ये त्यांना पोवाड्याची आवड निर्माण झाली. त्यावेळी त्यांनी नरवीर तानाजी मालुसरे यांचा पोवाडा गायला. गेली ४० वर्षे देशभर शाहिरी पोवाड्याच्या कार्यक्रमातून अनेक विषयांवर जनजागृती, राष्ट्रीय एकात्मता, अंधश्रद्धा, सामाजिक प्रबोधन, महापुरुषांचे चरीत्र यांची मांडणी केली आहे. मराठ्यांचे शूर सेनापती दत्ताजी शिंदे यांचे जीवनावर एक



हजार कडव्यांचा पोवाडा लिहून स्वतः गायला आहे. त्यांनी ६० पोवाड्यांचे लिखान केले आहे. इंदौर संस्थानचे संस्थापक राजे मल्हारराव होळकर यांचे जीवनावर आधारीत २१० ओळीचा पोवाडा त्यांनी तयार करून गायला आहे. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, तानाजी मालुसरे, वीर शिवा काशिद, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, राजर्षी शाहू महाराज, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील आदिंच्या जीवनावर अधारीत पोवाडे लिहून स्वतः गायले आहेत.

महाराष्ट्र व देशभरात दहा हजारांपेक्षा जास्त शाहिरी पोवाड्याचे कार्यक्रम त्यांनी केलेले आहेत. १८ पोवाडा कॅसेट त्यांच्या प्रकाशित झाल्या आहेत.

त्यांना नुकताच महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारा राज्य सांस्कृतिक पुरस्कार देण्यात आला आहे. त्याचबरोबर अकलुज भुषण पुरस्कार २०२५, भालेराव प्रतिष्ठान जळगाव, शाहिर फाटे पुरस्कार, मरवडे कृषिरत्न पुरस्कार, २०२५ शाहीर अमर शेख पुरस्कार, भिमरत्न पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. रयतेचा राजा राजा शिवछत्रपती या महानाट्याचा पोवाडा त्यांनी गायला आहे. लोककला व शाहिरी या विषयावर महाराष्ट्र शासन आयोजित कार्यशाळेत त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या या कायार्ची दखल घेवून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने सर्वोत्कृष्ट लोककलावंत हा पुरस्कार जाहिर केला आहे. त्याचे वितरण १४ जून २०२५ रोजी दुपारी ४ वाजता यशवंत नाट्य मंदिर, मनमाला टँक रोड, माटुंगा मुंबई येथे करण्यात येणार आहे.

या निमित्ताने शाहीरी राजेंद्र कांबळे यांचे अखिल भारतीय नाट्य परिषद मुंबई, अकलूज शाखा व समस्त नाट्य रसिक यांचे वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

# विशेष सहाय योजनेतील लाभार्थी यांचे पडताळणी शिबीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व नागरिकांना या जाहीर प्रसिध्दीकरणा द्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 20 ऑगस्ट 2019 अन्वये विशेष सहाय योजनेच्या लाभार्थी यांच्याकरिता दरवर्षी ह्यात प्रमाणपत्र घेणेबाबतच्या सुचना दिल्या आहेत. महाराष्ट्र शासन सामाजिक व न्याय विभाग यांचेकडील दिनांक 21 मे 2024 रोजीच्या पत्रान्वये संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना अर्थसहायाचे वितरण डी.बी.टी पोर्टल अन्वये करण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी विशेष सहाय योजनेतील सर्व लाभार्थ्यांची माहिती डी.बी.टी पोर्टलवर तात्काळ भरणेबाबत व लाभार्थी यांचे आधार पडताळणी करणेबाबत सुचना दिल्या आहेत.

सदर विशेष सहाय योजनेतील सर्व लाभार्थ्यांची माहिती डी.बी.टी पोर्टलवर तात्काळ भरणेबाबत व लाभार्थी यांचे आधार पडताळणी करणेचे कामकाज करण्याकामी उत्तर सोलापूर तालुक्यातील मंडळ अधिकारी कार्यालय स्तरावर शिबीर आयोजित करण्यात येत आहे. सदर शिबीराचे कामकाज करणेकामी 1 नायब तहसिलदार, दोन अव्वल कारकून, आठ मंडळ अधिकारी व 28 ग्राम महसूल अधिकारी यांची नियुक्ती करणेत आली आहे. शिबीराचा कालावधी दिनांक 12 जून 2025 ते दिनांक 13 जून 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत असेल. शिबीराचे स्थळ, दिनांक व वेळ खालील प्रमाणे- शिबीराचे स्थळ- तलाठी कार्यालय, कसबे सोलापूर, गुरूभेट, काँग्रेस भवन जवळ सोलापूर. सर्व मंडळ अधिकारी कार्यालय, बाळे, मजरेवाडी, कोंडी, शेळगी, सोरेगाव, तिऱ्हे, मार्डी, या ठिकाणी दिनांक 12 व 13 जून 2025 वेळ सकाळी 10.00 वाजता ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत असणार आहे.

लाभार्थी यांनी शिबिरास येताना डी.बी.टी पोर्टलवर नोंदणी व आधार पडताळणी करण्याकामी खालीलप्रमाणे कागदपत्रे घेऊन यावेत.

1. योजनेचे नांव- संजय गांधी निराधार योजना, संजय गांधी योजनेतील सर्व प्रवर्ग, विधवा, दिव्यांग,दुर्धर आजार पिडीत, घटस्फोटीत यांच्या साठी कागदपत्रे - आधार कार्ड छायांकित प्रत,बैंक पासबुक छायांकित प्रत, रेशन कार्ड छायांकित प्रत, माहिती भरलेले ह्यात प्रमाणपत्र, पतीचे मयत प्रमाणपत्र, वैद्यकीय अधिकारी यांचे दिव्यांग प्रमाणपत्र, दुर्धर आजार प्रमाणपत्र, मा.न्यायालयाचे घटस्फोट आदेश.

2.श्रावण बाळ योजना- आधार कार्ड छायांकित प्रत, बैंग पासबुक छायांकित प्रत, रेशन कार्ड छायांकित प्रत, माहिती भरलेले ह्यात प्रमाणपत्र, वय वर्षे 65 पुर्ण असलेचे पुरावा, शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, वैद्यकीय अधिक्षक वयाचे प्रमाणपत्र.

तरी सर्व नागरिकांनी शिबीर प्रसंगी वरीलप्रमाणे कागदपत्रासह उपस्थित राहून डी.बी.टी पोर्टलवर नोंदणी व आधार पडताळणी करून घेणेची दक्षता घ्यावी असे उत्तर सोलापूरचे तहसिलदार निलेश पाटील यांनी कळविले आहे.

# परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे बुधवार दिनांक 11 जून 2025 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

बुधवार दि. 11 जून 2025 रोजी दुपारी 12.30 वाजता विमान नगर पुणे येथून खाजगी वाहनाने पंढरपूर जि.सोलापूरकडे प्रयाण, दुपारी 4.00 वाजता शासकीय विश्रामगृह, पंढरपूर येथे आगमन व राखीव, दुपारी 4.15 वाजता पंढरपूर आषाढी वारी सन 2025 निमित्त पार्कीग व्यवस्था स्थळास प्रत्यक्ष पाहणी, स्थळ.1. भिमा यात्रा बसस्थानक मोहोळ व शेटफळ रस्ता. 2. चंद्रभागानगर बसस्थानक (मोहोळ व शेटफळ रस्ता). 3. विठ्ठल सहकारी साखर कारखाना बसस्थानक (टेंभुर्णी रस्ता). 4. पंढरपूर यात्रा बसस्थानक (औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बिडारी बंगलासमोर, सांगोला रस्ता). सायंकाळी 5.00 वाजता पंढरपूर आषाढीवारी सन 2025 निमित्त जादा वाहतूकीचे नियोजन करण्याबाबतच्या बैठकीस उपस्थिती. सायंकाळी 6.00 वाजता पंढरपूर ता.पंढरपूर जिल्हा सोलापूर येथून खाजगी वाहनाने सोलापूर शहर, जिल्हा सोलापूरकडे प्रयाण, सायंकाळी 6.30 वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन स्थळ - पेनुर, ता. मोहोळ जिल्हा सोलापूर, सायंकाळी 6.50 वाजता पेनुर, ता.मोहोळ, जिल्हा सोलापूर येथून खाजगी वाहनाने मोहोळ, ता.मोहोळकडे प्रयाण, सायंकाळी 7.10 वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, मोहोळ येथे आगमन, सायंकाळी 7.30 वाजता मोहोळ, येथून खाजगी वाहनाने सोलापूर शहराकडे प्रयाण, रात्री 9.00 वाजता हॉटेल बालाजी सरोवर प्रिमीयम, सोलापूर शहर येथे आगमन व मुक्काम.

गुरूवार दि.12 जून 2025 रोजी सकाळी 8.00 वाजता हॉटेल बालाजी सरोवर प्रिमीयम, सोलापूर शहर येथून खाजगी वाहनाने नळदुर्ग, ता.तुळजापूर, जि.धाराशिवकडे प्रयाण करतील.

## जाहीर प्रसिध्दीकरण

रे.मु.नंबर ७२७/२०१६ नि.१३

**सोलापूर येथील मे. सिव्हिल जज्ञ, सिनियर डिव्हिजन मे. व्ही. एम रेडकर सो यांचे कोर्टात**

स्टेट बँक ऑफ इंडिया
शाखा-ट्रेझरी
सोलापूर } वादी

**विरुध्द**

१)जुल्फीना म.रफिक.बागवान
रा.घर नं.१७१ बेगम पेठ लक्षीमी मार्केटच्या मागे सोलापूर } प्रतिवादी

दावा रक्कम रुपये ७४,८५७/-

ज्या अर्थी वादी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा -ट्रेझरी सोलापूर यांनी तुमच्या विरुध्द रक्कम रुपये ७४,८५७ /- वसूल होवून मिळणेसाठी या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर समन्साद्वारे तुम्ही सर्व प्रतिवादी स्वतः अगर वकिलामार्फत दाव्याचे बाबतीत आपले म्हणणे मांडणेकरिता या न्यायालयात दिनांक १४/०७/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता हजर होणेसाठी याद्वारे समन्स करुन बोलावण्यात येत आहे.

तुम्हास अशीही नोटीस देण्यात येते की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमचे गैरहजेरीत वादीची सुनावणी होवून निर्णय दिला जाईल, तसेच तुम्हांस अशी ही नोटीस देण्यात येते की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पुर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास 'तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल.

आज रोजी दिनांक ११/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली

(लिपिक) (शिक्का) सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,व स्तर सोलापूर.

# भरत गोगावले यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले हे बुधवार दिनांक 11 जून 2025 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. बुधवार दि. 11 जून 2025 रोजी सकाळी 8.00 वाजता शासकीय विश्रामगृह,पंढरपूर येथून श्री. विठ्ठल रुक्मीणी मंदिर पंढरपूर, जि.सोलापूरकडे प्रयाण, सकाळी 8.10 वाजता श्री.विठ्ठल रुक्मीणी मंदिर पंढरपूर, येथे आगमन व दर्शनासाठी उपस्थिती. सकाळी 9. 30 वाजता श्री. विठ्ठील रुक्मीणी मंदिर पंढरपूर येथून वारकरी पालखलीस्थळ सदगुरू मंगल कार्यालयकडे प्रयाण, सकाळी 10.00 वाजता वारकरी पालखीस्थळ सदरगुरू मंगल कार्यालय येथे आगमन व कार्यक्रमास उपस्थिती व सोयीनुसार जिल्हा छत्रपति संभाजी नगरकडे प्रयाण करतील

# सुब्रोतो कप फुटबॉल स्पर्धेसाठी 19 जून पर्यंत अर्ज करावेत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** क्रीडा व युवकसेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी सोलापूर व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित सुब्रोतो मुखर्जी स्पोटर्स एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्ली द्वारा सन 2025-26 या वर्षात 64 वी आंतरराष्ट्रीय सुब्रोतो कप फुटबॉल (सबज्युनिअर, ज्युनिअर) क्रीडा स्पर्धा सन 2025 चे आयोजित करण्यात येणार आहे. सदर राष्ट्रीय स्पर्धा दिनांक 18 ऑगस्ट ते 25 सप्टेंबर 2025 या कालावधीत 15 वषार्खालील मुले व 17 वर्षाखालील मुले, मुली या वयोगटाच्या स्पर्धा दिल्ली येथे आयोजित होणार आहेत.

सदर स्पर्धेस सहभागी होणाऱ्या खेळाडूंसाठी जन्म तारखेनुसार वयोमर्यादा पुढील प्रमाणे- अ). 15 वषार्खालील मुले त्यांचा जन्मदिनांक 1 जोनवारी 2011 रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. ब). 17 वर्षाखालील मुले, मुली जन्म दिनांक 1 जानेवारी 2009 रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. जिल्हास्तर सुब्रोतो फुटबॉल कप क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम खालील प्रमाणे- 15 वर्षे मुले स्पर्धा कालावधी दिनांक 25 जून 2025 स्पर्धा उपस्थिती दिनांक 15 जून 2025 रोजी सकाळी 9.00 वाजता, 17 वर्षे मुले, मुली स्पर्धा दिनांक 26 जून 2025 स्पर्धा उपस्थिती दिनांक 26 जून 2025 रोजी सकाळी 9.00 वाजता वालचंद कॉलेज सोलापूर येथे उपस्थित रहावे. व संघटना प्रतिनिधी किरण दुस्तकर मोबाईल क्रमांक-8788192124 किंवा मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड मोबाईल क्रमांक -7219157272 यांच्याशी संपर्क साधावा.

उपरोक्त कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षक यांना कळविण्यात येते की, आपल्या शाळेचे संघ निवड करून सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता ६६६. २४१ङ्क३ङ्क४स्र.ल्ल या संकेतस्थळावर खेळाडू व संघाची नोंदणी 19 जून 2025 रोजी करणे अनिवार्य आहे. तसेच प्रत्येक सहभागी संघानी रुपये 2 हजार रुपये सदर स्पर्धेच्या प्रवेशिका दिनांक 19 जून 2025 रोजी पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कुमठा नाका सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत जमा करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

# अवैध वाळू उपसाः सांगोला पोलीसांकडून सोनंद येथे मोठी कारवाई

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** शासनाची कोणत्याही प्रकारची रॉयल्टी न भरता, शासनाची परवानगी न घेता बेकायदेशीर रित्या वाळुचा उपसा प्रकरणी सोनंद ता.सांगोला येथे सांगोला पोलीसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे.पोलीसांनी १० लाख रुपये किंमतीचा पिवळ्या रंगाचे जेसीबी मशिन जप्त केले आहे तर टेम्पो चालकाने एक ब्रास वाळू सह टेम्पो पळवून नेला आहे.

सदर घटनेची फिर्याद पोकॉ. लक्ष्मण बापु वाघमोडे यांनी दिली आहे.याबाबत सांगोला पोलीसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, मौजे सोनंद गावचे हद्दीत कोरडा नदीचे पात्रात, मराठी शाळेच्या लगत, काही इसम हे जेसीबी च्या साहयाने चारचाकी वाहनामध्ये, अवैध्यरीत्या वाळू उपसा करुन, त्याची स्वतःच्या आर्थीक फायद्याकरीता, वाहतुक करुन विक्री करत असल्याची बातमी मिळाली होती.सदर ठिकाणी पो.हवा. काझी, पो.हवा. वजाळे, पो.कॉ. पांढरे असे खाजगी वाहनाने गेले. त्यावेळी नदीपात्रात वाहने नेता येत नसल्याने गावाचे बाजुला वाहने लावुन नदीपात्रात पोलीस पथकासह चालत गेले. तेथे एक पिवळ्या रंगाचा जेसीबी मशिनच्या सहायाने टेम्पो मध्ये वाळु भरत असल्याचे आढळून आले. जेसीबी व टेम्पो चे जवळ जात असल्याची चाहुल लागताच टेम्पोवरील चालक हा त्याचे ताब्यातील टेम्पो घेवुन पळुन गेला. वाळु भरत असणारा जेसीबी आम्ही जागीच पकडला असुन चालकासह सांगोला पोलीस ठाण्यास घेऊन आले असल्याची माहिती सांगोला पोलीस ठाण्याकडून मिळाली आहे.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात पानी फाउंडेशन द्वारे मुलाखतीचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे दिनांक १० जुन रोजी पानी फाउंडेशन द्वारे लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांसाठी आणि सोलापूर जिल्ह्यातील गट शेती चळवळीसाठी इच्छुक उमेदवारांसाठी ट्रेनर या पदाच्या मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. सदरील मुलाखत सत्राच्या सुरुवातीस लोकमंगल कृषी महाविद्यालया तर्फे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी सोलापूर जिल्हा पाणी फाउंडेशन समन्वयक सत्यवान देशमुख आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे बुके आणि विठ्ठल रुक्मिणी मूर्ती देऊन स्वागत केले. याप्रसंगी



डॉ. अमोल शिंदे यांनी पाणी फाउंडेशन मार्फत केल्या गेलेल्या विविध कामांचे कौतुक केले आणि उपस्थित सर्व उमेदवारांना मुलाखत सत्रा करिता शुभेच्छा दिल्या. पाणी फाउंडेशन सोलापूर जिल्हा समन्वयक सत्यवान देशमुख यांनी सदरील मुलाखत कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे विशेष आभार व्यक्त केले. ट्रेनर पदाच्या मुलाखतीसाठी एकूण ३२ उमेदवारांनी लोकमंगल कृषी महाविद्यालयात उपस्थिती दर्शवली. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी गणेश केदार याने केले. मुलाखत सत्राच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.अजित कुरे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. लोकमंगल कृषी महाविद्यालयाद्वारे अशा विविध मुलाखत सत्रांचे आयोजन विद्यार्थ्यांकरिता नियमित स्वरूपात करण्यात येते.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.क.अर्ज क्र:१००७/२०२४ नि.११

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन श्रीमती. एस. आर. ए. सैय्यद सो यांचे कोर्टात**

१)अंबादास हरिदास बंडी
वय: ३८ वर्षे, धंदा: नोकरी
२) सनतकुमार हरिदास बंडी,
वय - ४२ वर्षे, धंदा- मजुरी,
दोघे रा. २४८, रविवार पेठ, मारुती मंदिर जवळ, सोलापूर
३) गोपाल हरिदास बंडी
वय - ४० वर्षे, धंदा- नोकरी,
रा. ४३६, राघवेंद्रा नगर, मुळेगांव रोड, सोलापूर. } अर्जदार

**विरुध्द**

सोलापूर महानगरपालिका } सामनेवाला

ज्याअर्थी कै. हरिदास कृष्णहरी बंडी हे दि. १८/०८/२०२१ रोजी मयत झाले आहेत तसेच अर्जदार नं.१ ते ३ यांची आई कै. कलावती हरिदास बंडी हे दि.२०/१०/२००३ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्ज़दार नं.१ ते ३ यांचे भाऊ कै. श्रीधर हरिदास बंडी हे दि.१५/०२/२०१८ रोजी मयत झाले आहेत.मयत कै. हरिदास कृष्णहरी बंडी यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ ते ३ हे कायदेशीर वारसदार आहेत. कै. हरिदास कृष्णहरी बंडी यांचे नावे असलेल्या असलेल्या बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा सोलापूर येथे पेन्शनची शिल्लक रक्कम मिळण्याकरीता अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ३ हे मयताचे एकमेव वारस असल्याने मयताच्या मृत्यूपश्चात वर नमूद केलेल्या रकमेसंबंधी अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरबाबत अर्जदार नं.१ यांच्या नांवाने वारस प्रमाणपत्र देण्यास कुणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा नेमली तारीख १३/६/२०२५ रोजी हजर राहून हरकत घ्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ते आदेश करतील नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दिली ता. ११/०६/२०२५

(लिपिक) (शिक्का) सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.क.अर्ज क्र:३५३/२०२५ नि.३

**सोलापूर येथील में. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो यांचे कोर्टात**

अशोक नागनाथ माळी
वय : ६५ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
रा. स.नं. ३०३/२ प्लॉट नं. ५५, कल्याणनगर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर } अर्जदार

**विरुध्द**

श्रीमती सावित्रा अभिमान माळी
वय : ७५ वर्षे, धंदा : घरकाम
रा. २६, कल्याणनगर, जुळे सोलापूर
सौ. पार्वती उपेंद्र कामुनी
वय : ६५ वर्षे, धंदा : घरकाम
रा. बी ७२, आसरा सोसायटी,
होटगी रोड, सोलापूर
सौ. सुवर्णा सुरेश शिंदे
वय : ६५ वर्षे, धंदा : घरकाम
रा. ११७/९७, उमानगरी, मुरारजी पेठ,
सोलापूर
सौ. अंजली गोवर्धन आडकी
वय : ५९ वर्षे, धंदा : घरकाम
रा. प्लॉट नं. १० विजयनगर,
एमआयडीसी रोड, कुंभारी, सोलापूर
सौ. संजीवनी पांडुरंग बनकर
वय : ५३ वर्षे, धंदा : घरकाम
रा. २७८, लक्ष्मीमंदिर जवळ, कल्याणनगर-१,
होटगी रोड, सोलापूर } सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदाराने दिवाणी न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांचे सामनेवाला ही सख्खे बहिणी असून, त्यांचे वडिल नागनाथ निवृत्ती भोजने (माळी) हे दि. ३१/१२/२००४ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार व सामनेवाला यांची आई लक्ष्मी नागनाथ माळी (भोजने) यांचे दि. १९/०४/२००५ रोजी मयत झाले आहेत.

मौजे मजरेवाडी येथील सर्व्हे नं. ३०३/२ प्लॉट नं. ५५ कल्याणनगर, तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर यांसी क्षेत्र ५३.१४ चौ.मी. आहे. वर नमुद मिळकतीवर त्यांचे नाव लावण्यासाठी अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली दि.१४/०७/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दि. १०/६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी आहे.

क.लिपिक (शिक्का) सह अधिक्षक
सह.दि.न्या.क.स्तर सोलापूर